




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक १६७ * नांदेड * बुधवार, दि. २४ जून २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


## राज्यात अखेर पावसाला सुरुवात

### येत्या दोन दिवसांत नांदेडमध्येही पावसाची शक्यता

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यात अखेर मान्सूनचे आगमन झाले आहे. राज्यातील अनेक भागांमध्ये मान्सून पावसाच्या सरी बरसल्या आहेत. राज्यात सर्वदूर मान्सून पोहोचला आहे. आगामी सात ते आठ दिवसांमध्ये राज्यातील वेगवेगळ्या भागांमध्ये मान्सून जोरदार बरसणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. याशिवाय उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना दिलासा मिळणार आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार मराठवाड्यात पुढील चार दिवस येलो अलर्ट जारी करण्यात आला असून नांदेडमध्ये दोन दिवस पावसाची शक्यता आहे.

मागील काही दिवसांपासून रखडलेला मान्सून आता राज्यात सर्वदूर पसरला आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांना पुढील चार दिवसांसाठी पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर जालन्यात आज आणि उद्या पावसाची शक्यता आहे. यानंतर २६ जूनला पावसाची शक्यता आहे. परभणी, नांदेड आणि हिंगोली जिल्ह्यांना २६ जूनसाठी पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. नांदेडमध्ये आज आणि २५ जूनलाही पावसाची शक्यता आहे.

यासह हवामान विभागाकडून रायगड जिल्ह्याला आजसाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर उद्यापासून पुढचे चार दिवस पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. रत्नागिरी जिल्ह्याला आज पावसाचा रेड अलर्ट म्हणजेच अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला होता.

तसेच लातूर, धाराशिव या जिल्ह्यांना उद्यापासून सलग चार दिवस पावसाची शक्यता आहे. पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर अकोल्याला आजपासून पुढचे दोन दिवस आणि अमरावतीला आजपासून पुढचे तीन दिवस पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे.

## सीसीटीएनएस कामगिरीत नांदेड पोलीस दल राज्यात प्रथम

**नांदेड (प्रतिनिधी)–** गुन्हे व गुन्हेगार माहिती व्यवस्थापनासाठी विकसित करण्यात आलेल्या सीसीटीएनएस प्रणालीच्या कामगिरीमध्ये नांदेड जिल्हा पोलीस दलाने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. राज्यातील सर्व पोलीस घटकांच्या मासिक कामगिरीचे मूल्यांकन करण्यात आल्यानंतर नांदेड जिल्ह्याने सर्वोच्च गुण मिळवत हा मान मिळविला आहे.

सीसीटीएनएस प्रणालीअंतर्गत प्रथम माहिती अहवाल (एफआयआर), घटनास्थळ पंचनामे, आरोपी अटक, मालमत्ता जप्ती, दोषारोपपत्र, न्यायालयीन निकाल, हरवलेल्या व्यक्तींच्या नोंदी तसेच इतर महत्त्वाच्या पोलीस अभिलेखांची अचूक व वेळेत नोंद करण्यात जिल्ह्यातील पोलीस ठाण्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. या प्रभावी अंमलबजावणीमुळे जिल्ह्याला राज्यस्तरीय क्रमवारीत प्रथम स्थान प्राप्त झाले. जिल्हा पोलीस दलातील जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली सीसीटीएनएस विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेत आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला होता.

## नांदेड जिल्हा बँकेच्या निवडणुकीचा बिगुल वाजला

### १८ ऑगस्ट रोजी २३ जागांसाठी मतदान

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीचा बिगुल वाजला असून दि. १८ ऑगस्ट रोजी २३ जागांसाठी मतदान होणार आहे.




नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आगामी पंचवार्षिक निवडणुकीचा निवडणूक कार्यक्रम अधिकृतपणे जाहीर करण्यात आला आहे. निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक (सहकारी संस्था), नांदेड, शहाजराज हिरे यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था निवडणूक नियम २०१४ अन्वये ही अधिसूचना जारी केली असून, बँकेच्या संचालक मंडळाच्या २३ जागांसाठी ही निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे. या निवडणुकीसाठी दि.१० जून २०२६ (सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत) नामनिर्देशन अर्ज दाखल करणे, ८ जुलै २०२६ (सकाळी ११ वाजल्यापासून) नामनिर्देशन पत्रांची छाननी, १६ जुलै २०२६ (दुपारी ३ वाजेपर्यंत) उमेदवारी अर्ज मागे घेणे, दि.१८ ऑगस्ट (सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत) मतदान, १९ ऑगस्ट २०२६ (सकाळी ९ वाजेपासून) मतमोजणी होणार आहे.

या निवडणुकीत एकूण २३ जागांसाठी मतदान होणार असून त्यामध्ये प्रामुख्याने खालील घटकांचा समावेश आहे. प्राथमिक कृषी पतपुरवठा व विकास सेवा सहकारी संस्था १६ जागा (प्रत्येक तालुक्यासाठी एक).,नागरी सहकारी बँका, पतसंस्था, ग्रामीण बिगरशेती पतसंस्था इत्यादी १ जागा, इतर पात्र संस्था व व्यक्ती सभासद ५ जागा (यामध्ये अनुसूचित जाती/जमाती प्रतिनिधी १, महिला प्रतिनिधी २, इतर मागासवर्गीय प्रतिनिधी १ आणि भटक्या विमुक्त जाती/जमाती व विशेष मागास प्रवर्ग प्रतिनिधी १ यांचा समावेश आहे).

नामनिर्देशन अर्ज दाखल करणे, छाननी आणि अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात पार पडेल. मतदार यादी आणि नामनिर्देशन पत्रांबाबतची अद्ययावत माहिती बँकेच्या अधिकृत संकेतस्थळांवर (https://nandeddcc.org आणि https://scea.maharashtra.gov.in) उपलब्ध आहे. निवडणुकीशी संबंधित पुढील प्रक्रिया व मतदानाचे ठिकाण नियमानुसार नंतर जाहीर केले जाईल. अधिक माहितीसाठी इच्छुक उमेदवार व मतदारांनी छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यासमोर, स्टेशन रोड, नांदेड येथील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या मुख्य कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## किनवटमध्ये वीज कोसळून १५ वर्षीय मुलाचा मृत्यू; तिघे जखमी

**किनवट (प्रतिनिधी)–** किनवट तालुक्यातील चिखली बु. येथे मंगळवारी दुपारी ३ वाजेच्या सुमारास वीज कोसळून एका १५ वर्षीय मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर अन्य तिघे जखमी झाल्याची दुर्घटना घडली.



चिखली बु. शिवारात मंगळवारी दुपारी चिखली येथील शेख रशीद शेख मुक्रम (वय १५) याच्या अंगावर वीज पडल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. या दुर्घटनेत शेख अखिद शेख फिरोज (वय १५) व शेख सयान शेख सर्फराज (वय १४) हे गंभीर जखमी झाले असून त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी आदिलाबाद येथील रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

तसेच शेख अबीद शेख फिरोज (वय १६) हाही जखमी झाला असून त्याच्यावर किनवट उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच महसूल व प्रशासनातील अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा व आवश्यक कार्यवाही केली. याबाबतचा प्राथमिक अहवाल तहसील कार्यालयामार्फत सादर करण्यात आला आहे.

## पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांची पुणे येथे बदली; हिंगोलीचे एसपी निलभ रोहन नांदेडला

**नांदेड (प्रतिनिधी)–** शासनाच्या गृह विभागाने राज्यातील पोलीस अधीक्षक/पोलीस उपायुक्त दर्जाच्या दहा अधिकाऱ्यांची बदली केली आहे. या बदल्यांमध्ये नांदेडचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांची बदली पुणे येथे पोलीस उपायुक्त पदावर करण्यात आली आहे. तर हिंगोलीचे पोलीस अधीक्षक निलभ रोहन यांची नांदेडला पोलीस अधीक्षक पदावर बदली करण्यात आली आहे.

राज्य शासनाचे सहसचिव सुग्रीव धपाटे यांनी मंगळवार, दि.२३ जून रोजी १० अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत. त्यात श्रेणिक लोढा अतिरिक्त पोलीस अधीक्षक बुलढाणा यांना हिंगोली जिल्ह्याचे पोलीस अधीक्षकपद देण्यात आले आहे. तर नांदेडमध्ये मागील सुमारे दोन





वर्षांपासून पोलीस अधीक्षक पदावर कार्यरत असलेले अबिनाश कुमार यांची बदली डीसीपी पुणे शहर येथे करण्यात आली आहे.

नांदेडमध्ये मोठ्या प्रमाणात त्यांनी गुन्हेगारीवर नियंत्रण मिळविले होते. अनेक टोळ्यांना मोक्का तसेच एमपीडीएअंतर्गत हर्सुल कारागृहात स्थानबद्ध केले आहेत. यासोबतच त्यांनी अवैध व्यवसायाविरुद्धही ऑपरेशन फ्लॅश आऊट तसेच ऑपरेशन क्रॅक डाऊनअंतर्गत मोहिमा सुरू केल्या होत्या. या सोबतच रस्त्यावर वाढदिवस, मद्यपान किंवा हुल्लडबाजी करणाऱ्यांविरुद्धही मोठी कारवाई केली होती. विशेष म्हणजे अवैध वाळू घाटावर स्वतः दुचाकीवरून जाऊन कारवाया करून वाळू माफियांचे आर्थिक कंबरडे मोडले होते. नांदेड जिल्ह्यात यापूर्वीही अतिरिक्त पोलीस अधीक्षक म्हणून त्यांनी उत्तम काम केले होते. त्याच कामाचा अनुभव घेऊन त्यांनी दोन वर्ष पोलीस अधीक्षकपद यशस्वीरित्या सांभाळले.

हिंगोली जिल्ह्याचे निलभ रोहन यांची बदली हिंगोली जिल्ह्यातून नांदेड येथे करण्यात आली असून त्यांच्यापुढे नांदेडमधील गुन्हेगारीवर नियंत्रण कायम ठेवण्याचे मोठे आव्हान असणार आहे.

## केंद्र व राज्य सरकारच्या निषेधार्थ काँग्रेसचा जिल्हाधिकारी कार्यालयावर 'आसूड' मोर्चा

### शक्तीपीठ मार्ग म्हणजे उद्योगपतींसाठी रेडकार्पेट टाकणे होय –हर्षवर्धन सपकाळ

**नांदेड (प्रतिनिधी)–** शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी काँग्रेस पक्षाच्यावतीने केंद्र व राज्य सरकारच्या निषेधार्थ जिल्हाधिकारी कार्यालयावर मंगळवारी 'आसूड' मोर्चा काढण्यात आला. राज्यात येणारा शक्तीपीठ मार्ग म्हणजे उद्योगपतींसाठी रेडकार्पेट टाकणे होय, अशी टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी यावेळी केली.




केंद्र व राज्य सरकारची विविध धोरणे सर्वसामान्य नागरिकांना अडचणीत आणत आहेत. दररोज आकाशाला भिडणारी महागाई यामुळे जगणे अवघड झाले आहे. यात शेतकरी विरोधी धोरण राबविण्यात येत आहेत. शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी न देता जाचक अटी शेतकऱ्यांच्या माथी मारण्यात आल्या आहेत. ऐन पेरणीच्या काळात देखील सरकारच्या वतीने शेतकरी विरोधी धोरणे राबविण्याचे काम सुरु आहे. यामुळे शेती व इतर मागण्या घेऊन, प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या विशेष उपस्थितीत मंगळवारी शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर 'आसूड' मोर्चा काढण्यात आला. सकाळी १० वाजता पक्ष कार्यालय नवा मोंढा येथून मोर्चाची सुरूवात झाली. शेकडो कार्यकर्ते, पदाधिकारी, शेतकरी बैलगाड्या व ट्रॅक्टर सोबत घेऊन मोर्चात सहभागी झाले होते. यानंतर दुपारी हा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. येथे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सरकारच्या धोरणांवर टीका करून शेतकऱ्यांना न्याय देण्याची मागणी केली.

यावेळी शिष्टमंडळाच्या वतीने जिल्हा प्रशासनास निवेदन देण्यात आले. या मोर्चात दक्षिण जिल्हाध्यक्ष खा. रवींद्र चव्हाण, उत्तर जिल्हाध्यक्ष डॉ. विठ्ठल पावडे, महानगराध्यक्ष अब्दुल गफ्फार, माजी आ. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.






## मुदतबाह्य औषधांची विक्री प्रकरणी मे. तोष्णीवाल मेडिकलचा परवाना रद्द

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील डॉक्टर लेन भागातील मे. तोष्णीवाल मेडिकलमधून मुदतबाह्य (Expired) औषधांची विनाबिल विक्री होत असल्याचे तपासात स्पष्ट झाल्यानंतर दुकानाचा परवाना रद्द करण्यात आला आहे.

नांदेड जिल्ह्यातील परडवाडी (ता. नायगाव) येथील नागरिक हनुमंतराव मारोतराव वन्नाळीकर यांनी १३ जून रोजी अन्न व औषध प्रशासनाकडे ई-मेलद्वारे तक्रार दाखल करून हा गंभीर प्रकार प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिला होता. तक्रारीची गंभीर दखल घेत अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी १५ जून रोजी तक्रारदारांच्या उपस्थितीत डॉक्टर्स लेन परिसरातील मे. तोष्णीवाल मेडिकलवर प्रत्यक्ष छापा टाकून चौकशी केली. तपासादरम्यान मुदतबाह्य औषध ग्राहकाला विकण्यात आल्याचे उघड झाले. विशेष म्हणजे, हे औषध कोणतेही बिल न देता विकण्यात आल्याचेही तपासात समोर आले. त्यामुळे केवळ मुदतबाह्य औषधांची विक्रीच नव्हे तर ग्राहक संरक्षण आणि औषध विक्रीच्या नियमांचेही उघड उल्लंघन झाल्याचे स्पष्ट झाले आहे. यावरून औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० आणि नियम १९४५ मधील तरतुदींचे उल्लंघन झाल्याने अन्न व औषध प्रशासनाने संबंधित मेडिकलविरुद्ध कठोर भूमिका घेत थेट परवाना रद्द करण्याची कारवाई केली आहे. अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त (औषधे) अशोक राठोड यांनी या कारवाईची अधिकृत माहिती दिली आहे.




जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# पाकव्याप्त काश्मीरमधील असंतोष

आखाती प्रदेशातील दीर्घकाळ चाललेल्या संघर्षाच्या समाप्तीकडे जगाचे लक्ष लागले असताना, त्यातून निर्माण झालेल्या राजकीय आणि आर्थिक परिणामांचा सर्वाधिक फटका पाकिस्तानला बसल्याचे स्पष्ट होत आहे. अमेरिकेच्या पुढाकाराने युद्धविराम आणि शांततेच्या दिशेने वाटचाल सुरू झाली असली, तरी या संपूर्ण प्रक्रियेत पाकिस्तानची भूमिका दुय्यम ठरली आहे. एकेकाळी स्वतःला मध्यस्थ म्हणून सादर करण्याचा प्रयत्न करणाऱ्या इस्लामाबादला आंतरराष्ट्रीय स्तरावर अपेक्षित महत्त्व मिळाले नाही. यामुळे पाकिस्तानच्या परराष्ट्र धोरणातील मर्यादा पुन्हा एकदा अधोरेखित झाल्या आहेत. आधीच गंभीर आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या पाकिस्तानसमोर या घडामोडींनी नवे प्रश्न उभे केले आहेत. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या कठोर अटी, वाढती महागाई, परकीय चलनाचा तुटवडा आणि ऊर्जा आयातीवरील अवलंबित्व यामुळे देशाची अर्थव्यवस्था डळमळीत झाली आहे. इंधन, वीज आणि जीवनावश्यक वस्तूंच्या किमती प्रचंड वाढल्याने सामान्य नागरिकांचे जीवन कठीण बनले आहे. विकासकामांवरील खर्च कमी करून सरकार केवळ संरक्षण आणि अंतर्गत सुरक्षेवर भर देत असल्याने जनतेमध्ये असंतोष वाढत आहे. या असंतोषाचे सर्वाधिक तीव्र रूप पाकिस्तानव्याप्त काश्मीरमध्ये दिसून येत आहे. महागाई, पिण्याच्या पाण्याची कमतरता, वीजदरवाढ आणि गव्हावरील अनुदान कपात यामुळे तेथील नागरिक रस्त्यावर उतरले आहेत. मात्र या आंदोलनामागे केवळ आर्थिक प्रश्न नाहीत. त्याची मुळे राजकीय आणि प्रशासकीय अन्यायात खोलवर रुजलेली आहेत. पाकिस्तानव्याप्त काश्मीरला वरवर पाहता स्वतंत्र ओळख आणि स्वायत्ततेचा दर्जा देण्यात आला असला, तरी प्रत्यक्षात सर्व महत्त्वाचे निर्णय इस्लामाबादमधून घेतले जातात. कर आकारणी, नैसर्गिक संसाधनांचा वापर, आर्थिक नियोजन आणि परकीय गुंतवणूक यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवरील अधिकार स्थानिक लोकप्रतिनिधींऐवजी पाकिस्तान ज्याच्या नियंत्रणाखाली आहे त्या आयएसआय संस्थांकडे आहेत. त्यामुळे तेथील पंतप्रधान आणि राष्ट्रपती हे केवळ नामधारी पदाधिकारी ठरतात. लोकशाहीचा आणखी एक गंभीर प्रश्न म्हणजे अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर असलेले निर्बंध. पाकिस्तानव्याप्त काश्मीरमध्ये पाकिस्तानच्या धोरणांविरोधात भूमिका घेणाऱ्या व्यक्तींना किंवा पक्षांना राजकीय प्रक्रियेतून दूर ठेवले जाते. स्वातंत्र्याची मागणी करणे किंवा भारताशी संवादाची भूमिका घेणे हे देशद्रोह मानले जाते. अशा परिस्थितीत लोकशाही मूल्ये केवळ कागदावरच उरतात. विशेष म्हणजे, पाकिस्तानव्याप्त काश्मीर हा जलसंपत्तीने समृद्ध प्रदेश आहे. येथील नद्या आणि धरणांमधून मोठ्या प्रमाणावर वीज निर्मिती होते. परंतु ज्या लोकांनी या प्रकल्पांसाठी आपल्या जमिनी गमावल्या, त्यांनाच महागड्या दराने वीज विकली जाते. स्थानिक नागरिकांच्या दृष्टीने हा दुहेरी अन्याय आहे. संसाधनांचा लाभ बाहेरच्या भागांना मिळतो, तर त्याची किंमत मात्र स्थानिकांना मोजावी लागते. याशिवाय आरोग्य, शिक्षण आणि पायाभूत सुविधांकडे सातत्याने दुर्लक्ष करण्यात आले आहे. दुसरीकडे राजकीय नेते, अधिकारी आणि नोकरशाहीच्या विलासी जीवनशैलीवर मोठ्या प्रमाणात खर्च होत असल्याची भावना स्थानिकांमध्ये आहे. त्यामुळे शासनावरील विश्वास ढासळत चालला आहे. आज पाकिस्तानव्याप्त काश्मीरमध्ये दिसणारा जनक्षोभ हा केवळ तात्पुरत्या आर्थिक संकटाचा परिणाम नाही. तो अनेक दशकांपासून सुरू असलेल्या राजकीय उपेक्षा, आर्थिक शोषण आणि लोकशाही अधिकारांच्या गळचेपीविरुद्धचा उद्रेक आहे. पाकिस्तानची ढासळती अर्थव्यवस्था आणि वाढती राजकीय अस्थिरता या परिस्थितीला अधिक गंभीर बनवत आहेत. पाकिस्तानसमोर आज खरी कसोटी आहे ती या असंतोषाचे दमन करण्याची नव्हे, तर त्यामागील कारणे दूर करण्याची. लोकशाही मूल्यांचा आदर, स्थानिक स्वायत्ततेला बळकटी, संसाधनांवरील न्याय्य हक्क आणि विकासाचा समान लाभ याशिवाय या प्रदेशात दीर्घकालीन शांतता प्रस्थापित होऊ शकत नाही. अन्यथा पाकिस्तानव्याप्त काश्मीरमधील असंतोष भविष्यात आणखी व्यापक स्वरूप धारण करेल आणि त्याचे परिणाम केवळ त्या प्रदेशापुरते मर्यादित राहणार नाहीत.

# महिला राजनयिक: संवाद, सहकार्य आणि शांततेच्या दूत



दरवर्षी २४ जून रोजी जगभरात आंतरराष्ट्रीय महिला राजनयिक दिन साजरा केला जातो. आजच्या जागतिकीकरणाच्या युगात देशांमधील संबंध दृढ करण्यासाठी राजनय अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतो. या क्षेत्रात महिलांनी आपल्या बुद्धिमत्ता, संवादकौशल्य, संवेदनशीलता आणि नेतृत्वगुणांच्या बळावर विशेष स्थान निर्माण केले आहे. महिला राजनयिक या केवळ आपल्या देशाच्या हितांचे प्रतिनिधित्व करत नाहीत, तर विविध राष्ट्रांमध्ये संवाद, सहकार्य आणि परस्पर विश्वास वाढवण्याचे कार्यही करतात. संघर्षांचे शांततापूर्ण निराकरण, मानवाधिकारांचे संरक्षण, सांस्कृतिक देवाणघेवाण आणि जागतिक शांततेची स्थापना यासाठी त्यांचे योगदान अमूल्य आहे. त्यामुळे महिला राजनयिक या खऱ्या अर्थाने संवाद, सहकार्य आणि शांततेच्या दूत म्हणून ओळखल्या जातात.

महिला राजनयिक या विविध देशांतील सरकारे, आंतरराष्ट्रीय संस्था आणि सामान्य नागरिक यांच्यामध्ये संवादाचा प्रभावी सेतू म्हणून कार्य करतात. आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये उद्भवणारे मतभेद, गैरसमज किंवा तणाव दूर करण्यासाठी त्या संवाद आणि चर्चेचा मार्ग स्वीकारतात. त्यांच्या संवादकौशल्यामुळे विविध पक्षांमध्ये परस्पर समज, विश्वास आणि सहकार्याची भावना निर्माण होते.

संवेदनशील आणि गुंतागुंतीच्या विषयांवर चर्चा करताना महिला राजनयिक संयम, सहानुभूती आणि समतोल दृष्टिकोनाचा अवलंब करतात. त्यामुळे तणावपूर्ण परिस्थितीतही सकारात्मक वातावरण निर्माण होऊन रचनात्मक संवादाला चालना मिळते. तसेच, विविध देशांच्या संस्कृती, परंपरा आणि मूल्यांचा आदर राखत त्या संवाद साधतात, ज्यामुळे सांस्कृतिक भिन्नता अडथळा न ठरता परस्पर संबंध अधिक दृढ होतात. अशा प्रकारे महिला राजनयिक राष्ट्रांमधील मैत्रीपूर्ण संबंध मजबूत करण्यासाठी आणि जागतिक स्तरावर शांतता व सहकार्य वाढवण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान देतात.

महिला राजनयिक देशांमधील परस्पर सहकार्य वाढविण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. व्यापार, शिक्षण, आरोग्य, पर्यावरण संरक्षण, विज्ञान आणि तंत्रज्ञान यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये त्या राष्ट्रांना एकत्र आणून सहकार्याची नवी दालने उघडतात. जागतिकीकरणाच्या काळात कोणताही देश सर्व समस्या एकट्याने सोडवू शकत नाही; त्यामुळे परस्पर सहकार्य आणि समन्वय अत्यावश्यक ठरतो. या प्रक्रियेत महिला राजनयिक प्रभावी संवाद आणि समजुतीच्या माध्यमातून देशांमध्ये सकारात्मक संबंध निर्माण करतात.

हवामान बदल, दारिद्र्य, महामारी, अन्नसुरक्षा आणि जागतिक शांतता यांसारख्या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी त्या विविध आंतरराष्ट्रीय परिषद, शिखर संमेलने आणि बहुपक्षीय चर्चांमध्ये सक्रिय सहभाग घेतात. विविध देशांच्या हितसंबंधांचा समतोल राखत सामायिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी त्या वाटाघाटी आणि समन्वयाचे कार्य करतात. याशिवाय, विकास प्रकल्प, शैक्षणिक आणि वैज्ञानिक संशोधन, तांत्रिक सहकार्य तसेच सांस्कृतिक देवाणघेवाण यांना प्रोत्साहन देऊन त्या देशांमधील संबंध अधिक दृढ करतात. अशा प्रयत्नांमुळे केवळ आर्थिक आणि सामाजिक विकासालाच चालना मिळत नाही, तर जागतिक स्तरावर मैत्री, विश्वास आणि सहकार्याचे वातावरणही निर्माण होते. त्यामुळे महिला राजनयिक या आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या बळकटीकरणासाठी प्रभावी प्रेरक शक्ती ठरतात.

महिला राजनयिक या जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी आणि संघर्षांचे निराकरण करण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान देतात. युद्ध, सीमावाद, राजकीय तणाव किंवा इतर आंतरराष्ट्रीय संघर्षांच्या परिस्थितीत त्या शांततापूर्ण मार्गाने तोडगा शोधण्याचा प्रयत्न करतात. संवाद, समन्वय आणि परस्पर विश्वासाच्या माध्यमातून संघर्षग्रस्त पक्षांना एकत्र आणून मतभेद कमी करण्याचे कार्य त्या प्रभावीपणे पार पाडतात. संघर्षग्रस्त प्रदेशांमध्ये संवादाची प्रक्रिया अखंड सुरू राहावी यासाठी महिला राजनयिक सातत्याने प्रयत्नशील असतात. तणावपूर्ण वातावरणातही त्या संयम आणि सहानुभूतीने सर्व पक्षांचे म्हणणे ऐकून घेऊन रचनात्मक चर्चा घडवून आणतात. त्यामुळे संघर्षाचे स्वरूप अधिक गंभीर होण्यापासून रोखण्यास मदत होते. वाटाघाटी, मध्यस्थी आणि शांतता चर्चांद्वारे हिंसाचार कमी करण्यासाठी त्या महत्त्वाची भूमिका बजावतात. विविध गट, सरकारे आणि आंतरराष्ट्रीय संस्था यांच्यात समन्वय साधून परस्पर स्वीकारार्ह उपाय शोधण्याचा प्रयत्न करतात. याशिवाय, दीर्घकालीन आणि शाश्वत शांतता प्रस्थापित करण्यासाठी सामाजिक, राजकीय आणि आर्थिक घटकांना एकत्र आणून सहकार्याचे वातावरण निर्माण करतात. अशा प्रकारे महिला राजनयिक केवळ तात्पुरते संघर्ष निवारण करत नाहीत, तर विश्वास, संवाद आणि सहकार्याच्या आधारे स्थिर आणि शांततामय भविष्य घडविण्यासाठीही महत्त्वपूर्ण योगदान देतात.

महिला राजनयिक या महिला, मुले आणि समाजातील वंचित व दुर्बल घटकांच्या हक्कांसाठी जागतिक स्तरावर प्रभावीपणे आवाज उठवतात. आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर त्या समान संधी, न्याय आणि सन्मान मिळावा यासाठी सातत्याने प्रयत्नशील असतात. त्यांच्या कार्यामुळे समाजातील दुर्बल घटकांच्या समस्या अधिक ठळकपणे मांडल्या जातात आणि त्यावर उपाययोजना करण्यास चालना मिळते.

महिला राजनयिक या सांस्कृतिक राजनयाच्या प्रभावी वाहक म्हणून महत्त्वाची भूमिका बजावतात. त्या आपल्या देशाची समृद्ध संस्कृती, परंपरा, भाषा, कला आणि मूल्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रभावीपणे सादर करतात. यामुळे इतर देशांमध्ये आपल्या राष्ट्राविषयी सकारात्मक प्रतिमा निर्माण होते आणि सांस्कृतिक ओळख अधिक मजबूत होते. त्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन आणि सहभाग घेऊन देशांमधील सांस्कृतिक देवाणघेवाण वाढवतात. शैक्षणिक आदानप्रदान कार्यक्रम, विद्यार्थी शिष्यवृत्ती योजना आणि आंतरराष्ट्रीय प्रशिक्षण उपक्रमांना प्रोत्साहन देऊन त्या ज्ञान आणि अनुभवांची देवाणघेवाण सुलभ करतात. तसेच, पर्यटन क्षेत्रालाही चालना मिळून आर्थिक आणि सामाजिक संबंध अधिक दृढ होतात.

विविध संस्कृतींमधील परस्पर आदर, सहिष्णुता आणि समज वाढवण्याचे कार्य महिला राजनयिक प्रभावीपणे करतात. त्या वेगवेगळ्या समाजांतील भिन्नतेला अडथळा न मानता एकमेकांकडून शिकण्याची संधी म्हणून पाहतात, ज्यामुळे आंतरराष्ट्रीय मैत्री अधिक मजबूत होते. लोक-ते-लोक संबंध दृढ करण्यासाठी त्या सातत्याने प्रयत्नशील असतात. त्यामुळे केवळ सरकार-ते-सरकार संबंधच नव्हे, तर सामान्य नागरिकांमधील नातेही अधिक घनिष्ठ आणि विश्वासपूर्ण बनते. अशा प्रकारे महिला राजनयिक सांस्कृतिक समज आणि जागतिक ऐक्य वाढवण्यात महत्त्वपूर्ण योगदान देतात.

महिला राजनयिक आपल्या कार्यातून प्रभावी नेतृत्व, आत्मविश्वास आणि ठोस निर्णयक्षमता यांचे उत्तम उदाहरण घालून देतात. आंतरराष्ट्रीय स्तरावर गुंतागुंतीच्या आणि आव्हानात्मक परिस्थितींमध्येही त्या शांतपणे विचार करून योग्य निर्णय घेतात, ज्यामुळे त्यांच्या नेतृत्वगुणांचे महत्त्व अधोरेखित होते.

त्या तरुण महिलांसाठी प्रेरणास्थान ठरतात आणि त्यांना सार्वजनिक सेवा, प्रशासन तसेच आंतरराष्ट्रीय संबंधांसारख्या क्षेत्रांमध्ये करिअर करण्यासाठी प्रोत्साहित करतात. त्यांच्या यशामुळे समाजात महिलांसाठी नवीन संधी आणि शक्यता निर्माण होतात. कठीण आणि तणावपूर्ण परिस्थितीतही संयम, दूरदृष्टी आणि व्यावसायिकता राखून काम करण्याचा आदर्श त्या निर्माण करतात. यामुळे आंतरराष्ट्रीय राजनयात स्थिरता आणि विश्वासार्हता वाढते. याशिवाय, महिला सक्षमीकरणाचा सकारात्मक संदेश समाजापर्यंत पोहोचवून त्या स्त्री-पुरुष समानतेचा विचार अधिक मजबूत करतात. त्यांच्या कार्यामुळे महिलांचे समाजातील स्थान अधिक बळकट होते आणि समान संधींची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यास मदत होते.

महिला राजनयिक जागतिक विकास प्रक्रियेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. हवामान बदल, दारिद्र्य, आरोग्य संकटे, अन्नसुरक्षा आणि शाश्वत विकास यांसारख्या गंभीर जागतिक आव्हानांवर उपाय शोधण्यासाठी त्या सातत्याने प्रयत्न करतात. या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी त्या विविध देशांना एकत्र आणून सामायिक धोरणांची आखणी करण्यास मदत करतात.

आंतरराष्ट्रीय संस्थांबरोबर, जसे की संयुक्त राष्ट्रे आणि इतर जागतिक संघटनांबरोबर, समन्वय साधून विकास कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी सुलभ करणे हेही त्यांच्या कार्याचे महत्त्वाचे अंग आहे. त्यामुळे विकास योजनांचा लाभ अधिक व्यापक प्रमाणात समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचतो. याशिवाय, जागतिक स्थैर्य आणि प्रगती साधण्यासाठी आवश्यक असलेल्या धोरणात्मक चर्चांमध्ये त्या सक्रिय सहभाग घेतात. विविध देशांच्या हितसंबंधांचा समतोल राखत दीर्घकालीन आणि शाश्वत विकासाच्या दिशेने निर्णय घेण्यास त्या मदत करतात. अशा प्रकारे महिला राजनयिक जागतिक विकासाला दिशा देणारी महत्त्वाची शक्ती ठरतात.

महिला राजनयिक या केवळ आपल्या देशाच्या प्रतिनिधी नसून संवाद, सहकार्य, समजूतदारपणा आणि शांततेच्या खऱ्या दूत असतात. त्यांच्या नेतृत्वामुळे राष्ट्रांमध्ये विश्वास वाढतो, संघर्ष कमी होतात आणि अधिक शांततापूर्ण, समतोल व प्रगत जग निर्माण करण्यास मदत होते.

-डॉ. आरती राणे
नांदेड
मो.९८६०६३८५७५

# पाऊस लांबला; बळीराजाची चिंता वाढली

यावर्षी सरासरीपेक्षा कमी आणि उशिरा पाऊस येईल असे भाकीत भारतीय हवामान खात्याने तसेच स्कायमेटने वर्तवले होते. आज ते भाकीत खरे ठरताना दिसत आहे कारण दरवर्षी ७ जूनला येणारा मान्सून अजूनही आलेला नाही. अल निनोमुळे मान्सून लांबला असल्याचे कारण या क्षेत्रातील तज्ज्ञ देत आहे. आता जूनच्या शेवटच्या आठवड्यात मान्सूनचे आगमन होईल असे हवामान खात्याने सांगितले आहे हा अंदाज खरा ठरावा आणि वरून राजाने कृपा करावी यासाठी बळीराजाने देव पाण्यात बुडवले आहेत. कारण आपल्या देशातील बहुतांशी शेती ही पावसावर आहे. सुमारे ६० टक्क्यांहून अधिक शेती पावसावर अवलंबून असल्याने बळीराजाचे डोळे पावसाकडे लागले आहेत.



पाऊस लांबल्याने पेरणी लांबली आहे. पेरणी लांबल्याने शेतीचे वेळापत्रकच कोलमडून पडले आहे गेल्या काही वर्षात हे चित्र सातत्याने पाहायला मिळत होते यावर्षी तेच होणार असे एकंदरीत दिसत आहे. यावर्षी जून महिन्याच्या सरासरी १० टक्के इतकाही पाऊस झालेला नाही. राज्यातील खरीप पिकाच्या एकूण क्षेत्रापैकी ०.७७ टक्केच म्हणजेच केवळ १ टक्के क्षेत्रावरच पेरणी झाली आहे. राज्यात खरीप पिकाचे सरासरी क्षेत्र १४२.०२ लाख हेक्टर असून ऊस पिकासह हे सरासरी क्षेत्र १५२. ९७ लाख हेक्टर आहे. पाऊस लांबल्याने आता क्षेत्रात पेरणी देखील रखडली आहे. जर हीच परिस्थिती कायम राहिली आणि पावसाने ओढ दिली तर त्याचा परिणाम केवळ खरीप हंगमावरच नाही तर रब्बी हंगामांवर देखील होऊ शकतो. पाऊस लांबल्याने कृषी उत्पादनाची टक्केवारी अर्थातच कमी होण्याची शक्यता आहे.

पाऊस कमी झाला की महागाई वाढते हे समीकरणच आहे. महागाई वाढली की त्याचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर होतो. यावर्षी पाऊस लांबल्याने जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न देखील निर्माण होऊ शकतो? देशातील बावीस कोटी जनावरांचा चारा पावसावरच अवलंबून आहे. जर वेळेत आणि पुरेसा पाऊस झाला नाही तर या जनावरांच्या अस्तित्वावरच प्रश्नचिह निर्माण होऊ शकते. पोटच्या लेकरांप्रमाणे वढवलेले पशुधन टिकवायचे कसे या विवंचनेत बळीराजा आहे. जर पाऊस वेळेत झाला नाही जनावरांना चारा मिळाला नाही तर देश देशातील दूध उत्पादन घटू शकते परिणामी त्याचा फटका दुग्धजन्य पदार्थांना बसू शकतो. एकूणच पाऊस वेळेत आणि पुरेसा आला नाही तर त्याचा फटका शेतीलाच नाही तर देशाच्या अर्थव्यवस्थेला बसू शकतो.

देशाची अर्थव्यवस्था आता कुठे रुळावर येऊ लागली असताना हे संकट उभे राहिले असल्याने या संकटाला सामोरे जाण्यासाठी सरकारने आतापासूनच तयारी करायला हवी. मागील काही वर्षांपासून निसर्गचक्र बदलले आहे. पावसाचे प्रमाण आणि महिनेही बदलले आहेत. जेंव्हा नको तेंव्हा पाऊस पडतो आणि जेंव्हा गरज असते तेंव्हा दडी मारतो. दोन दोन महिने न येणारा पाऊस दोन दिवसात दोन महिन्याची सरासरी पूर्ण करतो मात्र त्याचा आपल्या शेतीला काही उपयोग होत नाही उलट नुकसानच होते. देशातील कृषी क्षेत्र नेऋत्य पावसावर अवलंबून असल्याने निसर्गाच्या लहरीपणाचा फटका शेतकऱ्यांना बसतो. पावसाने हुलकावणी दिल्याने पिण्याच्या पाण्याचाही मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. ऐन जून महिन्यात अनेक गावांत टँकरने पाणी पुरवठा केला जात आहे.

धरणातील पाण्याचा साठा संपत आल्याने अनेक ठिकाणी आठवड्यातून एकदा किंवा दोनदा पाणीपुरवठा होत आहे. जर ऐन पावसाळ्यात ही अवस्था असेल पुढील उन्हाळ्यात काय अवस्था असेल याची कल्पना जरी केली तरी अंगावर काटा येतो. अल निनोमुळे निसर्गचक्र बिघडले असे म्हटले जात असले तरी याला केवळ अल निनोच जबाबदार आहे असे नाही. याला आपण म्हणजे मानव देखील तितकेच जबाबदार आहे हे मान्य करावे लागेल कारण मानवाने कारण नसताना निसर्गावर अतिक्रमण केले.

बेसुमार वृक्षतोड करून सिमेंटची जंगले उभारली. जितके वृक्ष तोडले तितके वृक्ष लावले नाहीत या सर्व बाबी निसर्गाच्या लहरिपणास जबाबदार आहेत. आता तरी आपण सुधारायला हवे. वृक्षतोड थांबवायला हवी. निसर्गात मानवाचा होणारा हस्तक्षेप रोखायला हवा. सरकारनेही पाण्याचे योग्य नोयोजन करायला हवे. शेतकऱ्यांनीही मान्सूनच्या बदलत्या आलेखानुसारच शेतीचे नियोजन करायला हवे.

-श्याम ठाणेदार
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# आधी माणूस बना?

आधी माणूस बना. अनेक संत महात्म्यांनी हेच सांगितलं. अनेक विचारवंतही हेच सांगत आलेत आणि अनेक आई-वडीलही आपल्या बाळाला हेच सांगून थकलेत. त्यातच माणूस बनविणारा घटक अर्थात शिक्षकही हेच सांगत आले. परंतु लोकं माणूस बनले नाहीत. त्यांची स्थिती ही श्वानाच्या शेपटीगत झाली. श्वानाचं शेपूट जसं कोणत्याही नळीत टाकून वर्षोगणती ठेवलं. तरी ते जसं सरळ होत नाही, अगदी तसंच घडलं. माणूस हा आकारानं माणूस झाला. विचारानं माणूस बनलेला नाही. तो आजही जनावरच आहे. अगदी अनादीकालापासून. ज्याला राक्षस संबोधलं जात होतं.

आपल्याला रामायण आठवतं. ज्यात रावणानं सीतेचं अपहरण केलं. कैकेयीनं रामाला चौदा वर्षे वनवास दिला. या घटना आठवतात. महाभारतातील दुर्योधनाचं वागणं आठवतं. ज्यानं आपल्या आईसमान असलेल्या द्रौपदीचा शुल्लक कारणावरुन विनयभंग केला. तसं पाहिल्यास पांडव व कौरवांना शिकविणारा गुरु एकच. ज्यानं सर्वांना शिक्षेत भेदभाव न करता एकच शिक्षा दिली. तरीही पांडव वेगळ्या विचारांचे बनले व कौरव वेगळ्याच. आजही जन्म देणारी आई व वडील तेच असताना, त्यांना शिकविणारे गुरुही तेच असताना, परिसर व शेजारीही तेच असताना एक भाऊ बिभीषणा-सारखा निघतो तर दुसरा रावणासारखा. असं का घडतं? त्याचं कारण आहे, आपल्यातील विचार. काहींच्या मनात कुविचार चालत असतात. ते कुविचार एखाद्या श्वानाच्या शेपटीसारखे असतात. तर काहींच्या मनात सुविचार चालत असतात. जे श्वानाच्या मस्तकासारखे असतात. अर्थात श्वाना-ची शेपटी ही कुसंस्कार विचार करणाऱ्यांसारखी तर सुसंस्कार हे श्वानाच्या मस्तकासारखे असतात. ज्यातून श्वानाची इमानदारी दिसून येते.

अलिकडील काळात माणूस बनण्याची वानवा आहे. माणूस बनण्यासाठी अनेक शिबीरं आयोजित केली जातात. त्या शिबिरात तत्वज्ञान सांगि तलं जातं. अनेक उच्चप्रतिची उच्चशिक्षित मंडळी माणूस बनविण्याचे तत्वज्ञान घेवून शिबिरात हजर होत असतात. जी मंडळी भरगच्च शुल्क घेतात. जे भरगच्च शुल्क घेऊन शिबिरात मार्गदर्शन करीत असतात आणि राबविणारे घटकही भरगच्च शुल्क घेवून माणूस बनविण्याचे शिबिरं आयोजित करीत असतात. कारण त्यात त्यांचा स्वार्थ असतो. त्यांना पैसा मिळत असतो, भरगच्च पैसा. ज्या पैशातून अनेक शिबीरं आयोजित करता येतात. एवढंच नाही तर त्या पैशातून त्यांचं घरंही चालवता येतं.

माणूस हा माणूस नाही. एक प्रकारचे जनावर बरे. जनावरात व माणसात फरक नाही. तसं पाहिल्यास जनावरंही माणसं असतात व माणसं ही जनावरं. एका शेतात म्हशी शिरताच त्यांना हाकलण्यासाठी माणस-ाला जर राग येवून तो म्हशीला काठीनं बेदम मारत असेल तर त्याच्यातील जनावर जागा झाला असं म्हणता येईल. अशावेळेस त्याला माणूस समजायचं की जनावर, तेच कळायला मार्ग नाही. याऊलट एखादा आपल्या घरचा श्वान आपल्या घराची रक्षा करीत असेल तर तो माणूसच. असे बरेच प्राणी आहेत की जे आपल्याला विनास्वार्थानं मदत करतात. कारण ती जनावरं जरी असली तरी त्यांच्यात थोडीशी माणुसकी असते. त्यांनाही दुःख असतंच. फरक एवढाच की आपण सांगू शकतो. ते सांगू शकत नाहीत. परंतु त्यांचीही एक सांकेतिक भाषा असते. ती भाषा फक्त माणसांनाच कळते की जे माणूस बनलेले असतात. इतरांना कळत नाही की ज्यांच्यात माणूस निवास करीत नसतोच.

तथागत गौतम बुद्ध आणि हेच सांगत आले अनेक संत, महात्मा आणि हेच सांगत आले टुर्वीच्या काआतील ऋषीमुनी. ज्थांनी कितीतरी वर्ष तपश्चर्या केली. तपश्चर्या कशासाठी? तर ती होती माणूस बनण्यासाठी. त्यांनी शौचाची क्रिया उत्तम प्रकारे केली होती. शौच याचा अर्थ फक्त शरीराच्या अंतर्गत भागा-तील असलेली घाण अर्थात गुद्वाराच्या व मुत्रमार्गाच्या द्वारे घाण बाहेर काढणे नाही, तर शौच म्हणजे मनातील सर्व अशुद्ध गोष्टी बाहेर काढणे. जसे मनातून षड्रिपू बाहेर काढणे. राग, लोभ, मोह, माया बाहेर काढणे. ही शौचाची क्रिया पुर्ण केल्याशिवाय कोणालाच माणूस बनता येत नाही. आम्रपाली, अंगुलीमालनं तेच केलं. साधू संतांनी तेच केलं. बऱ्याचशा ऋषीमुनींनीही तेच केलं. बऱ्याचशा याचा अर्थ मोजक्या. कारण काही उरलेले ऋषीमुनी हे शिघ्रकोपी होते. त्यांनी तपश्चर्येनं ज्या सिद्ध्या प्राप्त केल्या होत्या. त्याचा दुरुपयोग करुन ते शाप देत होते.

आपला मेंदू हा एका क्षणाला अनेक विचार अर्थात सात प्रकारचे विचार करू शकतो. एक क्षण अर्थात एक सेकंद नाही. त्यापेक्षा कितीतरी कमी वेळ. मग एक तासाचा वेळ म्हणजे त्यात कितीतरी क्षण आलेत. हेच घडलं अनेक ऋषीमुनी, संत, महात्म्ये आणि तथागतांच्याही जीवनात. तेच तत्वज्ञान त्यांनी इतरांना शिकवलं. ज्यातून आम्रपालीची भिक्षुणी आम्रपाली बनली. अंगुलीमालचा अहिंसक बनला आणि एका अहंकारी राजाचा विश्वामित्र.

विशेष सांगायचं म्हणजे प्रत्येकाला माणूस बनता येतं. त्यासाठी त्याला कोणत्याही शिबिरात जायची व मार्गदर्शन घेण्याची गरज नाही. फक्त विचार बदलविण्याची गरज आहे. आटलं जीवन सुख, दुःख यांनी भरलेलं असतं. अनेक संकटांचा सामना आपल्याला करावा लागतो. तेव्हा आपल्या मनात जर प्रत्येक गोष्टीबाबत सकारात्मक भावना निर्माण केली तर निश्चितच आपल्या सर्वांना माणूस बनता येईल. त्यासाठी आवश्यक आहे, शांत राहाणे. थोडंसं ध्यानस्थ बसलं तर अगदी बरंच. कारण चंचल मनाला शांती प्रदान व्हावी म्हणून थोडावेळ जेवन झाल्यावर पद्मासन अवस्थेत ध्यानस्थ बसणं गरजेचं. जेवन झाल्यावर यासाठी की त्यानं आपलं शरीर ताणलं जावून आपल्या अन्नपचन क्रियेवर दबाव पडत नाही. ज्यातून शरीराच्या अंतर्गत भागातील जेवन लवकर पचण्यास मदत होते. तसंच मनात ज्या क्रिया सुरु असतात. त्या क्रियेवरही नियंत्रण आणता येतं. महत्वपुर्ण बाब ही की माणूस बनायचं असेल तर कोणत्याही शिबिरात जाण्याची गरज नाही. कारण माणूस बनायला लागतं मन. स्वतःच घरच्या घरी राहून आपल्या मनाला आपण बदलवू शकतो. त्यासाठी आपण स्वतःच्या मनात सकारात्मक विचार निर्माण करण्याची गरज आहे. नकारात्मक विचारांचा त्याग करण्याची गरज आहे. या गोष्टी जेव्हा आपल्या मनात घडतील. तेव्हाच आपल्याला माणूस बनता येईल. नाहीतर आपण जनावरंच राहू. हे तेवढंच खरं.

-अंकुश शिंगाडे
नागपूर
मो. ९३७३३५९४५०

# समुपदेशनाद्वारे जिल्ह्यात ८६ केंद्रप्रमुखांची नियुक्ती



**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्हा परिषद नांदेडच्या शिक्षण विभागामार्फत केंद्रप्रमुख मर्यादित स्पर्धा परीक्षेतील पदोन्नती प्रक्रियेनुसार जिल्ह्यातील रिक्त ८६ केंद्रप्रमुख पदांसाठी नुकतीच समुपदेशनाद्वारे नियुक्ती प्रक्रिया पारदर्शकपणे पूर्ण करण्यात आली. ही प्रक्रिया जिल्हा परिषदेच्या कै. यशवंतराव चव्हाण सभागृहात प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

शिक्षण संचालक, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्र प्रमुख पदोन्नतीसाठी अर्ज मागविण्यात आले होते. त्यानंतर जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षक, पदवीधर शिक्षक तसेच पदोन्नत मुख्याध्यापक यांची लेखी परीक्षा घेण्यात आली होती. परीक्षा निकालानुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी करून पात्र व अपात्र यादी प्रसिद्ध करण्यात आली होती. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी पात्र उमेदवारांना समुपदेशनाद्वारे पदस्थापना देण्याचा निर्णय जाहीर केला होता.

यानुसार जिल्ह्यातील केंद्रप्रमुख संवर्गातील ८३ सर्वसाधारण व ३ दिव्यांग अशा एकूण ८६ रिक्त पदांसाठी समुपदेशन प्रक्रिया राबविण्यात आली. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, उपशिक्षणाधिकारी नागराज बनसोडे व प्रज्ञा भवरे, प्रशासन अधिकारी राघवेंद्र मदनूरकर तसेच शिक्षण विभागातील अधिकारी व सर्व गटशिक्षणाधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्यातील केंद्रप्रमुख पदांच्या मोठ्या प्रमाणावरील रिक्त जागा लक्षात घेऊन सर्व तालुक्यांतील रिक्त पदांचा ७५ टक्के तालुका समतोल साधत अनुशेष भरण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे सर्व तालुक्यांमध्ये समप्रमाणात केंद्रप्रमुखांची नियुक्ती करणे शक्य झाले.

## जिल्ह्यात पीएम किसान योजनेचे ३ लाख ८२ हजार ६६० लाभार्थ्यांना ७६.५३ कोटी रुपये वितरीत

**नांदेड (प्रतिनिधी)**–प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा माहे एप्रिल २०२६ ते जुलै २०२६ कालावधीतील २३ वा हप्ता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते २० जून २०२६ रोजी पश्चिम बंगालमधील हुगळी जिल्ह्यातील तारकेश्वर येथून वितरीत करण्यात आला.

केंद्र शासनाने शेतकऱ्यांना निश्चित उत्पन्न देण्याकरिता प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पी. एम. किसान) योजना माहे फेब्रुवारी, २०१९ पासून सुरू केली आहे. या योजनेच्या निकषांनुसार सर्व पात्र शेतकरी कुटुंबास (पती, पत्नी व त्यांची १८ वर्षाखालील अपत्ये) २ हजार रुपये प्रती हप्ता या प्रमाणे तीन समान हप्त्यात प्रती वर्षी ६ हजार रुपये त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात लाभ जमा करण्यात येत आहे. पी. एम. किसान योजने अंतर्गत जिल्ह्यातील पात्र शेतकरी कुटुंबांना यापूर्वी एकूण २२ हप्त्यांमध्ये सुमारे १८०७.४१ कोटी रुपयांचा लाभ जमा झालेला आहे.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पी. एम. किसान) योजनेच्या लाभासाठी केंद्र शासनाकडून लाभार्थ्याने भूमी अभिलेख नोंदणी अद्ययावत करणे, बँक खाते आधार संलग्न करणे व ई-केवायसी प्रमाणिकरण करणे या बाबी बंधनकारक केलेल्या आहेत. जिल्ह्यातील सद्यस्थितीत या तीनही बाबींची पूर्तता केलेल्या एकूण ३ लाख ८२ हजार ६६० शेतकरी कुटुंबांना २० जून, २०२६ रोजी सुमारे रक्कम रुपये ७६.५३ कोटी रुपये इतक्या रक्कमेचा लाभ त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट हस्तांतरणाद्वारे जमा झाला आहे, अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी नांदेड यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

## गुटखा व अंमली पदार्थ विरोधी मोहिमेत तीन आठवड्यात ८ हजार पानटपऱ्यांची झाडाझडती, ५८ गुन्हे दाखल

### १ कोटी १८ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**नांदेड (प्रतिनिधी)** –दिनांक १ ते ३० जून २०२६ दरम्यान, पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी नांदेड परिक्षेत्रात गुटखा व अंमली पदार्थ विरोधी मोहीम उघडली आहे.

या मोहिमेअंतर्गत, दि. १ ते २१ जून २०२६ दरम्यान संपलेल्या तिसऱ्या आठवड्याअखेर गुटखा व्यावसायिकांविरुद्ध कलम १२३ भारतीय न्याय संहितेअंतर्गत नांदेड जिल्ह्यात (१६), परभणी जिल्ह्यात (१८), हिंगोली जिल्ह्यात (७), तर लातूर जिल्ह्यात (९) असे एकूण (५०) गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे गांजा विक्री, साठवणूक व वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध एनडीपीएस कायद्याखाली नांदेड जिल्ह्यात (६), तर परभणी व लातूर जिल्ह्यात प्रत्येकी (१) अशा एकूण (८) करण्यात आल्या आहेत.

गुटखा व अंमली पदार्थांच्या विरोधात मागील तीन आठवड्यात उपरोक्त प्रमाणे एकूण (५८) कारवाया करण्यात आल्या असून, एकूण (८५) आरोपींकडून १ कोटी १८ लाख १ हजार ११६ रुपये किंमतीचा गुटखा, गांजा व अन्य साहित्य जप्त करण्यात आले आहे.

**पान टपऱ्यांची व्यापक तपासणी मोहीम :** गुटखा व प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांची पानटपऱ्यांवरून होणारी विक्री थांबविण्यासाठी पोलिसांनी पान टपऱ्यांची व्यापक तपासणी मोहीम हाती घेतली आहे. मागील तीन आठवड्यांत, नांदेड परिक्षेत्रात पोलिसांनी आठ हजारहून अधिक पानटपऱ्यांची तपासणी केली असून, अंमली पदार्थांच्या साठवणुकीची संभाव्य ठिकाणे देखील तपासण्यात येत आहेत.

**'खबर' हेल्पलाईनला वाढता प्रतिसाद :** अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलिसांना पोहोचविता यावी, या दृष्टिकोनातून पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाने ९१ ५० १०० १०० हा मोबाईल क्रमांक असलेली 'खबर' नावाची हेल्पलाईन सुरू केली असून, सदर हेल्पलाईनवरून नागरिक अवैध व्यवसायांची अचूक माहिती पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयापर्यंत पोहोचवत आहेत. नागरिकांनी आपल्या भागातील गुटखा, अंमली पदार्थ व इतर अवैध व्यवसायांची माहिती, सदर क्रमांकावर फोन करून अथवा व्हाट्सअप मेसेज द्वारे पाठवावी व आपल्या भागातील अवैध व्यवसायांना आळा घालण्यासाठी आपला सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले आहे.

## स्वारातीम विद्यापीठात 'सेज जर्नल्स' व 'ज्ञान स्रोत केंद्र' यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष लेखक कार्यशाळा संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)**– स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे ज्ञानस्रोत केंद्र आणि 'सेज जर्नल्स' यांच्या संयुक्त विद्यमाने 'एन्हांसिंग रिसर्च एक्सलन्स विथ ओएनओएस' (ओएनओएसच्या सहाय्याने संशोधन गुणवत्तेचे संवर्धन) या विषयावर एका विशेष ऑनलाईन लेखक कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले.



संशोधन क्षेत्रात जागतिक दर्जाची मानके आत्मसात करणे आणि संशोधनाची दृश्यमानता वाढवणे हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता. सध्याच्या स्पर्धात्मक युगात उत्कृष्ट संशोधन करण्यासोबतच ते योग्य व्यासपीठावर प्रकाशित करणे अत्यंत आवश्यक झाले आहे. याच उद्देशाने 'सेज पब्लिकेशन्स' येथील मुख्य मार्गदर्शक मनोज गुप्ता (वरिष्ठ व्यवस्थापक - प्रशिक्षण आणि विश्लेषण) यांनी उपस्थित संशोधकांना सखोल मार्गदर्शन केले. मार्गदर्शकांनी ओएनओएस प्लॅटफॉर्मचा प्रभावी वापर कसा करावा, हस्तलिखित सादर करताना कोणती काळजी घ्यावी आणि जागतिक प्रकाशन मानकांनुसार संशोधनाचा दर्जा कसा उंचवावा, याविषयी महत्त्वपूर्ण तंत्रे आणि प्रात्यक्षिके सादर केली. संशोधनपर लेख का, कसे, कुठे प्रकाशित करावयाचे यावर त्यांनी प्रकाश टाकला.

विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मनोहर चासकर यांचे मार्गदर्शनात आणि प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांच्या मुख्य उपस्थितीत ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. ज्ञानस्रोत केंद्राचे प्र. संचालक डॉ. जगदीश कुलकर्णी यांनी या कार्यशाळेचे आयोजन केले होते. सेज जर्नल्सच्या ग्राहक प्रशिक्षण आणि संवाद समन्वयक शगुन गोयल व रेणू राणा याही कार्यशाळेस उपस्थित होत्या. विद्यापीठाच्या दूरस्थ शिक्षण विभागाचे संचालक डॉ. प्रकाश निहलानी, 'नॅक', 'आय.क्यू.ए.सी.' आणि 'एन.आय. आर.एफ.' चे संचालक डॉ. सुरेंद्रनाथ रेड्डी, डॉ. नितीन दारकुंडे, डॉ. उदय दिव्यवीर, डॉ. स्मिता पाटील, डॉ. शिवाजी सोनटक्के, डॉ. सुनिता माने, डॉ. अभिजित पांडे, डॉ. अरुण हंबर्डे यांचेसह अनेक प्राध्यापक, ग्रंथपाल, संशोधक, विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

## जिल्हा व सत्र न्यायालयात योग दिवस उत्साहात साजरा



**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील जिल्हा व सत्र न्यायालयात जागतिक योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई यांच्या सुचनेनुसार प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष नरेंद्र ब्रह्मे यांच्या आदेशान्वये जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव शरद देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त २० जून रोजी सकाळी ७ वा. जिल्हा व सत्र न्यायालय नांदेड येथे योग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश नरेंद्र ब्रह्मे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच न्याायालयातील बहुतांश न्यायाधीश, अधिकारी, विधिज्ञ, कर्मचारी तसेच उपस्थित मान्यवरांनी उत्साहाने सहभाग घेतला.

कार्यक्रमात योग प्रशिक्षक म्हणून शिवा बारकुल आणि श्रीमती मीना कुमारी बैतुल्ला यांच्या मार्गदर्शनाखाली विविध योगासने व प्राणायामाचे मास्टर ओंकार व अर्जुन डांगे यांनी प्रात्यक्षिके करून दाखवली. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश नरेंद्र ब्रह्मे यांनी योगामुळे शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ राहण्यास मदत होते. दैनंदिन जीवनात तणावमुक्त राहण्यासाठी योगाचे महत्व सांगून योगासनामधील विविध आसनांबद्दल मोलांचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रम शांतता व उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. उपस्थित सर्वांनी नियमितपणे योगाभ्यास करण्याचा संकल्प केला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थितांनी समाधान व्यक्त केले.

## योग ही विज्ञाननिष्ठ संकल्पना -प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे

**नांदेड (प्रतिनिधी)**– भारताने विश्वाला दिलेली देणगी म्हणजे योग होय. योग ही विज्ञाननिष्ठ संकल्पना असून स्वतःचा स्वतःकडे होणारा प्रवास म्हणजे योग आहे. माणसाच्या शारीरिक, मानसिक आणि भावनिक आरोग्याचा संबंध योगाशी असल्यामुळे निश्चितच ही विज्ञाननिष्ठ बाब असल्याचे प्रतिपादन माजी प्र-कुलगुरू प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे यांनी केले.

बाराव्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त यशवंत महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना, क्रीडा, राष्ट्रीय छात्र सेना आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या वतीने आयोजित योग प्रात्यक्षिकाच्या समारोप सोहळ्यात ते बोलत होते.

योग प्रशिक्षक डॉ. रुद्रावती चव्हाण व डॉ. माधव पुयड यांनी भद्रासन, वज्रासन, ताडासन, प्राणायाम, क्षुलभासन आदी विविध योग प्रयोगाचे प्रात्यक्षिक उपस्थित वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून करवून घेतले. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. साईनाथ बिंदगे, डॉ. शिवाजी सूर्यवंशी, डॉ. रत्नमाला म्हस्के, डॉ. मनोज पैंजणे, प्रा. उत्तम केंद्रे, प्रा. राहुल टिचकुले यांनी परिश्रम घेतले. तसेच डॉ. अजय गव्हाणे, संदीप पाटील, कालिदास बिरादार, गजानन पाटील यांनी सहकार्य केले.

## सुधारणा नव्हे, तर सरकारची माघार : तख्त सचखंड श्री हजूर साहिबच्या स्वायत्ततेसाठीचा आमचा लढा सर्वोच्च न्यायालयात

### ■ याचिकाकर्ते जगदीपसिंग नंबरदार

**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील गुरुद्वारा सचखंड श्री हजूर अबचलनगर साहिब अधिनियम १९५६ मध्ये सुधारणा सुधारणा नव्हे, तर सरकारची माघार आहे, तख्त सचखंड श्री हजूर साहिबच्या स्वायत्ततेसाठीचा आमचा लढा सर्वोच्च न्यायालयात आहे, असे याचिकाकर्ते जगदीपसिंग नंबरदार यांनी निवेदनात म्हटले आहे.

येथील गुरुद्वारा सचखंड श्री हजूर अबचलनगर साहिब अधिनियम १९५६ मध्ये सुधारणा करण्याबाबत राज्य सरकारने अलीकडे घेतलेल्या भूमिकेचे चित्रण एक प्रशासकीय सुधारणा म्हणून केले जात आहे. मात्र, जगभरातील शीख संगतने हे समजून घेतले पाहिजे की, ही कोणतीही स्वयंस्फूर्त किंवा सद्भावनेतून करण्यात येणारी सुधारणा नाही. हा निर्णय आम्ही गेल्या अनेक वर्षांपासून मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) खंडपीठापासून ते भारताच्या सर्वोच्च न्यायालयापर्यंत दिलेल्या सातत्यपूर्ण कायदेशीर लढ्याचा थेट परिणाम आहे. सर्वोच्च न्यायालयासमोर आपल्या भूमिकेचे समर्थन करण्यात राज्य सरकार अपयशी ठरत असल्यानेच आता त्यांना कायद्यात सुधारणा करण्याची वेळ आली असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

८ मार्च २०२२ रोजी निवडून आलेल्या संचालक मंडळाचा कार्यकाळ संपल्यानंतर जवळपास चार वर्षे शीख समाजाचे लोकशाही हक्क प्रभावीपणे निलंबित ठेवण्यात आले. नियमानुसार निवडणुका घेण्याऐवजी राज्य सरकारने नियुक्त केलेल्या प्रशासकांच्या माध्यमातून गुरुद्वाराचे व्यवस्थापन सुरू ठेवण्यात आले.

सरकारकडे वारंवार निवेदने देऊनही कोणतीही कार्यवाही न झाल्याने आम्हाला न्यायालयीन मार्ग स्वीकारावा लागला. ॲड. एम. डी. नरवडकर आणि ॲड. वसीफ सलीम शेख यांच्या मार्फत मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे रिट याचिका क्र. १००५/२०२२ दाखल करण्यात आली. माननीय उच्च न्यायालयाने राज्य सरकारला तीन महिन्यांच्या आत निवडणुका घेण्याबाबत निर्णय घेण्याचे निर्देश दिले.

मात्र, न्यायालयाच्या आदेशाचा आदर करून निवडणूक प्रक्रिया सुरू करण्याऐवजी सरकारने विलंब करण्याचे धोरण अवलंबले. परिणामी आम्हाला अवमान याचिका क्र. ५११/२०२३ दाखल करावी लागली. या कार्यवाहीदरम्यान सरकारने न्यायालयासमोर असे प्रतिपादन केले की, संबंधित नियम व कायद्यात सुधारणा करण्याचा विचार सुरू आहे.

सरकारच्या या भूमिकेमुळे निवडणुका अनिश्चित काळासाठी पुढे ढकलल्या जाऊ शकतात आणि प्रशासकीय नियंत्रण कायम ठेवले जाऊ शकते, हे लक्षात घेऊन आम्ही भारताच्या सर्वोच्च न्यायालयात संविधानाच्या कलम ३२ अंतर्गत याचिका दाखल केली. सर्वोच्च न्यायालयाच्या थेट देखरेखीखाली प्रकरण गेल्यानंतर राज्य सरकारवर कायदेशीर आणि घटनात्मक दबाव वाढला असून, त्यातूनच ही सुधारणा प्रक्रिया सुरू झालेली दिसते.


राज्य सरकारची ही अचानक निर्माण झालेली घाई ही योगायोग नसून सर्वोच्च न्यायालयातील कार्यवाहीचा परिणाम आहे. लोकशाही निवडणुका केवळ प्रशासकीय कारणांवर अनिश्चित काळासाठी पुढे ढकलता येत नाहीत, हे घटनात्मक तत्त्व स्पष्टपणे स्थापित झालेले आहे. विद्यमान कायद्यांतर्गत निवडणुका न घेता प्रशासकांच्या माध्यमातून संस्थेचे व्यवस्थापन सुरू ठेवणे आणि मतदार याद्या तयार न करणे, या बाबींचे समर्थन करणे सरकारसाठी अधिकाधिक कठीण होत चालले आहे असेही निवेदनात म्हटले.

सरकारच्या प्रस्तावित सुधारणांची आम्ही गंभीर दखल घेत आहोत; मात्र त्याचवेळी आम्ही अत्यंत सतर्क आहोत. फेब्रुवारी २०२४ मध्ये सरकारने १७ पैकी १२ सदस्य नामनिर्देशित करण्याचा प्रस्ताव मांडला होता. या प्रस्तावामुळे शीख संगतचे लोकशाही हक्क मोठ्या प्रमाणात बाधित झाले असते. देश-विदेशातील शीख समाजाच्या तीव्र विरोधानंतर आणि तख्त सचखंड श्री हजूर साहिबच्या पवित्र भूमीतून उठलेल्या आंदोलनांमुळे तो प्रस्ताव मागे घेण्यात आला असल्याचेही निवेदनात म्हटल आहे.

# लिंबोटी धरणाचे पाणी लाभ क्षेत्रात तत्काळ सोडा

### माजी आ. शंकरअण्णा धोंडगे यांची मागणी

**लोहा (प्रतिनिधी)**– जून महिना संपत आला असला तरी निसर्गाने पाठ फिरवल्यामुळे लोहा, कंधार तालुक्यातील शेतकरी अडचणीत सापडले आहेत. सध्या लिंबोटी धरणात २७ द. ल. घ. मिटर (३५) टक्के साठा उपलब्ध आहे. पावसाळा असल्याने येणाऱ्या काळात हे धरण पुन्हा भरणार आहे. अनेक गावातील शेतकऱ्यांची पिके वाळून जात आहेत, त्यामुळे लिंबोटी धरणाचे पाणी लाभ क्षेत्रात तत्काळ सोडा, अशी मागणी माजी आमदार तथा शिवसेना शेतकरी परिषदेचे राज्याध्यक्ष शंकरअण्णा धोंडगे यांनी जिल्हाधिकारी व जलसंपदा विभागाकडे निवेदनाद्वारे केली आहे.



मानार प्रकल्पात मृत साठ्यापेक्षा २४ दशलक्ष घनमीटर (३५%) पाणी शिल्लक आहे, त्यामुळे जुलैमधील पाण्याने धरण पहिल्या टप्प्यात भरून जाईल, पण शिल्लक साठ्याचा उपयोग होणार नाही. त्यामुळे कंधार-लोहा लाभ क्षेत्रात काही शेतकऱ्यांनी कापूस व हळदीची लागवड केली असून, सध्या पावसाने पाठ फिरवल्यामुळे जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. त्यामुळे संबंधित जलसंपदा विभागास लाभ क्षेत्रात पाणी सोडण्याच्या सूचना देऊन सहकार्य करावे, अशी मागणी एका निवेदनाद्वारे माजी आमदार शंकरअण्णा धोंडगे यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे.

## औद्योगिक प्रशिक्षण संस्थातील शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेंतर्गत ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु

**नांदेड (प्रतिनिधी)**– औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिल्प कारागीर प्रशिक्षण योजना अंतर्गत ऑगस्ट-२०२६ सत्रासाठीची प्रवेश प्रक्रिया २१ मे २०२६ पासून आयटीआय dmission Portal: https://admission.dvet.gov.in या संकेतस्थळावर सुरु करण्यात आलेली आहे. नांदेड जिल्ह्यातील युवक व युवती (उमेदवारांनी) यांनी मोठ्या प्रमाणात ऑनलाईन पद्धतीने प्रवेश अर्ज व निश्चितीकरण करण्याचे आवाहन श्री गुरु गोबिंदसिंघजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य एस. व्ही. सूर्यवंशी यांनी केले आहे. यासाठी दहावी उत्तीर्ण अथवा अनुतीर्ण इच्छुक विद्यार्थी अर्ज करू शकतात, असेही कळविले आहे.

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रवेश घेण्यासाठी तयार करण्यात आलेल्या प्रमाणित कार्यपद्धती व माहिती पुस्तीका ऑनलाईन स्वरुपात संकेतस्थळावर Download Section मध्ये पीडीएफ स्वरुपात उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांनी अर्ज नोंदवून झाल्यावर उमेदवारांनी नजीकच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये जाऊन आपला अर्ज निश्चित करावा व त्यानंतर विकल्प सादर करावे. प्रवेश प्रकियेच्या विविध टप्प्यांबाबत औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये समुपदेशन करण्यात येत आहे. यामध्ये उमेदवारांना विविध व्यवसाय अभ्यासक्रमांची माहिती देण्यात येते.

राज्यभरातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये एकूण ८३ प्रकारच्या व्यवसाय अभ्यास-क्रमांचे प्रशिक्षण दिले जात असून त्यांची एकूण वार्षिक प्रवेश क्षमता जवळपास एक लक्ष ऐवढी आहे. येणाऱ्या कालावधीत औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये जादा मागणीचे तसेच अधिकचे तंत्रज्ञानावर आधारित ६५२ नवीन अभ्यासाच्या तुकड्या समाविष्ठ करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच जागतिक बँकेच्या सहकार्याने औद्योगिक प्रशिक्षण संस्था आधुनिकीकरण करण्यात येत आहे.

तसेच आयटीआय प्रवेशित उमेदवारांना प्रतिमाह देण्यात येणाऱ्या विद्या वेतनात वाढ करण्यात आली आहे. विविध प्रवर्गात उमेदवारासाठी प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्वी योजनाही लागू करण्यात आली आहे. दहावी अनुउत्तीर्ण विद्यार्थ्यांना आयटीआय अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर नियमानुसार दहावी उत्तीर्ण समकक्षता करण्यात येते तर दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना आयटीआय अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर नियमानुसार बारावी उत्तीर्ण समकक्षता प्रदान करण्यात येते. तरी दहावी उत्तीर्ण अथवा अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांनी आयटीआयमधून व्यावसायिक शिक्षण पूर्ण करून त्वरित रोजगार स्वयंरोजगार अथवा उच्च शिक्षणाच्या संधी प्राप्त होण्यासाठी आयटीआयमध्ये प्रवेश घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# शिवमहापुराण श्रवणाने पापांचा परिहार; गोदावरी तीरावर कथा ऐकण्याचे विशेष महत्त्व -शिवम शुक्ल महाराज

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– विष्णुपुरी येथील पवित्र गोदावरी नदीच्या तीरावर श्री सत्संग सेवा समिती काळेश्वर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शिवमहापुराण कथा सप्ताहाची रविवारी महाप्रसादाने भक्तिमय वातावरणात आणि मोठ्या उत्साहात सांगता झाली

सात दिवस चाललेल्या या आध्यात्मिक ज्ञानयज्ञात हजारो भाविकांनी सहभागी होऊन शिवकथेचा लाभ घेतला.सप्ताहाच्या समारोपप्रसंगी आंतरराष्ट्रीय कथाप्रवचक तथा शिवमहापुराण विशारद शिवम शुक्ल महाराज यांनी शिवमहापुराणाचे महत्त्व, गोदावरी नदीचे पावित्र्य तसेच भगवान श्रीराम, श्रीहनुमान आणि द्वादश ज्योतिर्लिंगांचे आध्यात्मिक महत्त्व यावर सखोल विवेचन केले.





यावेळी बोलताना शिवम शुक्ल महाराज म्हणाले की, शिवमहापुराणाचे श्रद्धापूर्वक श्रवण केल्याने मनुष्याच्या सर्व पापांचा परिहार होतो. भगवान शिवांच्या कृपेने जीवनात रिद्धी-सिद्धी, सुख, शांती, समृद्धी आणि आध्यात्मिक उन्नती प्राप्त होते. ज्या घरात शिवभक्ती असते त्या घरात धन-धान्याची कधीच कमतरता भासत नाही. शिवकथेच्या प्रभावाने कुटुंबात आनंद, ऐश्वर्य आणि समाधान नांदते. श्रद्धा आणि भक्तिभावाने भगवान शंकरांची आराधना केल्यास भक्तांच्या मनोकामना पूर्ण होतात. अपत्यप्राप्तीची इच्छा असलेल्या दांपत्यांनाही शिवकथेच्या पुण्याईमुळे आणि भगवान शंकरांच्या कृपेने अपत्यसुख प्राप्त होते, असे त्यांनी सांगितले.

गोदावरी नदीच्या महात्म्या विषयी बोलताना त्यांनी सांगितले की, भारतीय संस्कृतीत गोदावरी नदीला अत्यंत पवित्र आणि पुण्यदायी स्थान प्राप्त आहे. गोदावरीच्या नाभीस्थानी शिवमहापुराण कथा श्रवण करणे हे विशेष फलदायी मानले जाते. या पवित्र स्थळी कथा ऐकल्याने मनुष्याच्या पापांचा नाश होऊन आत्मिक शुद्धी प्राप्त होते. सर्व नद्यांमध्ये गोदावरी नदी श्रेष्ठ असून तिचे धार्मिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक महत्त्व अतुलनीय आहे, असेही त्यांनी नमूद केले.

समारोपाच्या दिवशी महाराजांनी भगवान श्रीराम आणि परमभक्त श्रीहनुमान यांच्या दिव्य नात्याचेही भावपूर्ण वर्णन केले. श्रीराम हे धर्म, सत्य, मर्यादा आणि आदर्श जीवनाचे प्रतीक आहेत, तर श्रीहनुमान हे भक्ती, सेवा, निष्ठा आणि समर्पणाचे मूर्तिमंत रूप आहेत. श्रीरामांच्या कार्यासाठी स्वतःचे संपूर्ण जीवन अर्पण करणाऱ्या हनुमानांच्या चरित्रातून प्रत्येकाने कर्तव्यनिष्ठा, सेवाभाव आणि भक्तीचा आदर्श घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

## मौजे ब्रम्हपुरी गोदावरी नदीच्या पात्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

**नांदेड (प्रतिनिधी)** –मौजे ब्रम्हपुरी येथील गोदावरी नदी पात्र परिसरात शांतता व सुव्यवस्था अबाधीत रहावी यासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ नुसार नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीतील नदी पात्रातील परिसर प्रतिबंधीत क्षेत्र म्हणून २३ जून २०२६ रोजीचे ६ वाजेपासून ते २२ जुलै २०२६ रोजीचे मध्यरात्रीपर्यंत घोषित करण्यात आले आहे. त्याबाबत पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी आदेश निर्गमित केले आहेत.

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ नुसार प्राप्त अधिकाराचा वापर करुन वादग्रस्त जागा, ज्याची चतु:सिमा पूर्वेस वाजेगाव कोल्हापुरी बंधारा, पश्चिमेस नांदेड ते देगलूरकडे जाणाऱ्या रोडवरील जुना पूल, दक्षिणेस गोदावरीचे नदीचे पात्र आणि उत्तरेस चिल्ला/दर्गाची संरक्षण भिंत यामधील जागा २३ जून रोजी सकाळी ६ वाजेपासून ते २२ जुलै रोजीच्या मध्यरात्रीपर्यंत भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ प्रमाणे प्रतिबंधीत क्षेत्र म्हणून पोलीस अधीक्षक यांनी घोषित केले आहे.

निरोगी आरोग्याचा कानमंत्र

# निरामय



दिवसभर उत्साही आणि ताजेतवाने राहण्यासाठी पुरेशी आणि शांत झोप घेणे महत्त्वाचे आहे. कधीकधी काही लोकांना रात्री झोपताना घाम आल्यामुळे अस्वस्थ वाटते, ज्यामुळे झोपेची कमतरता निर्माण होऊ शकते. जर तुम्हालाही रात्री जास्त घाम येण्याचा त्रास होत असेल, तर ते एका गंभीर समस्येचे लक्षण असू शकते. तज्ज्ञांच्या मते, काही लोक सकाळी उठल्यावर घामाने पूर्णपणे भिजलेले असतात. जर तुम्ही वारंवार घामाने भिजून जागे होत असाल आणि तुमचे कपडे किंवा अंथरूण ओले झालेले आढळत असेल, तर याला 'रात्रीचा घाम' (नाईट स्वेट्स) म्हणतात. सतत येणारा रात्रीचा घाम हे एखाद्या आरोग्य समस्येचे लक्षण असू शकते. थायरॉईडच्या समस्या, हार्मोनल बदल, तणाव किंवा औषधांची प्रतिक्रिया ही त्याची कारणे असू शकतात. जास्त घामामुळे झोपेत व्यत्यय येऊ शकतो आणि तुमच्या मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो.

## तुम्हालाच उष्णता अन् घामाचा का त्रास? समस्या आत आहे, बाहेर नाही...

## रात्री घाम येण्याची कारणे कोणती आहेत?

- हार्मोनल बदल : प्रत्येक व्यक्तीला, मग ती पुरुष असो वा स्त्री, झोपेत घाम येण्याचा अनुभव येऊ शकतो. बहुतेक महिलांमध्ये मेनोपॉज आणि पेरीमेनोपॉज दरम्यान इस्ट्रोजेन आणि प्रोजेस्टेरॉन हार्मोनच्या पातळीत वेगाने चढ-उतार होतात. याचा परिणाम शरीराच्या तापमान-नियंत्रण प्रणालीवर होऊ शकतो. यामुळे महिलांना अचानक उष्णतेच्या लाटा (हॉट फ्लॅशेस) आणि रात्री जास्त घाम येणे यांसारखी लक्षणे जाणवू शकतात. रात्री घाम येण्याचे हे सर्वात सामान्य कारण मानले जाते.
- थायरॉईडच्या समस्या : थायरॉईडच्या समस्या असलेल्या लोकांना रात्री जास्त घाम येऊ शकतो. जेव्हा थायरॉईड ग्रंथी जास्त सक्रिय होते, तेव्हा व्यक्तीचे वजन झपाट्याने कमी होऊ शकते किंवा घाम येऊ शकतो. यामुळे रात्री घाम येऊ शकतो. अनेक अभ्यासांमध्ये असेही दिसून आले आहे, की हायपरथायरॉईडीझम हे रात्री घाम येण्याचे एक प्रमुख कारण असू शकते.
- झोपेचे विकार : झोपेच्या विकारांमुळे देखील रात्री घाम येऊ शकतो. ऑब्स्ट्रक्टिव्ह स्लीप ॲप्निया ही एक अशी स्थिती आहे ज्यामध्ये झोपताना व्यक्तीचा श्वास वारंवार थांबतो. हे रात्री घाम येण्याचे एक कारण असू शकते. म्हणूनच स्लीप ॲप्निया आणि रात्री घाम येणे यांच्यात संबंध आढळला आहे.
- ताण आणि तणाव : जेव्हा एखादी व्यक्ती दीर्घकाळ तणावाखाली असते, तेव्हा तिला रात्री घाम येऊ शकतो. मानसिक ताण, चिंता आणि पॅनिक डिसऑर्डर शरीराच्या 'फाइट-ऑर-फ्लाइट' मोडला सक्रिय करतात. यामुळे ॲड्रेनालाईनची पातळी वाढते, ज्यामुळे शरीराचे तापमान वाढून घाम येऊ शकतो.

### रात्री येणारा अतिरिक्त घाम कसा टाळावा?

- रात्री सैल, सुती कपडे घाला.
- खोलीचे तापमान थंड आणि शांत ठेवा.
- भरपूर पाणी प्या.
- तणाव आणि चिंता कमी करण्यासाठी ध्यान आणि श्वासोच्छवासाचे व्यायाम करा.
- जर तुम्हाला स्लीप ॲप्निया किंवा इतर समस्या असतील, तर त्वरित तपासणी करून घ्या आणि डॉक्टरांचा सल्ला घ्या.
- कोणतेही औषध घेतल्यानंतर तुम्हाला रात्री घाम येत असल्यास, डॉक्टरांचा सल्ला घ्या.

- संसर्गामुळे येणारा घाम : घाम येणे ही संसर्गाला दिलेली एक सामान्य शारीरिक प्रतिक्रिया आहे. जेव्हा रोगजंतू शरीरात प्रवेश करतात, तेव्हा रोगप्रतिकारशक्ती सक्रिय होते, ज्यामुळे हायपोथॅलॅमसवर परिणाम करणारे रसायन स्रवते. यामुळे शरीराचे तापमान वाढते, ज्यामुळे घाम येतो.
- औषधांचे परिणाम : चिंता कमी करणारी औषधे, हार्मोन थेरपी आणि मधुमेहावरील औषधे शरीराच्या तापमान नियंत्रण प्रणालीवर परिणाम करू शकतात. यामुळे औषध घेतल्यानंतर रात्री जास्त घाम येऊ शकतो.

## रात्रीच्या जेवणानंतर आईस्क्रीम खाता का?




थकवणाऱ्या दिवसानंतर रात्रीच्या जेवणासोबत किंवा जेवणानंतर थंड, गोड आईस्क्रीम खायला काही लोकांना आवडते. पण प्रश्न असा आहे की, रात्रीच्या जेवणानंतर आईस्क्रीम खाणे शरीरासाठी सुरक्षित आहे का, किंवा त्याचे पचन, वजन आणि आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतात का ? तज्ज्ञांच्या मते, अधूनमधून माफक प्रमाणात आईस्क्रीम खाणे हानिकारक मानले जात नाही, परंतु जर तुम्ही दररोज रात्री मोठ्या प्रमाणात त्याचे सेवन केले, तर त्यामुळे पचनक्रिया मंदावणे, पोट फुगणे, गॅस, रक्तातील साखर वाढणे आणि झोपेत अडथळा येणे यांसारख्या समस्या उद्भवू शकतात. जड जेवणासोबत आईस्क्रीम खाल्ल्याने पचनक्रियेवर परिणाम होऊ शकतो. आईस्क्रीममध्ये सामान्यतः साखर, सॅचुरेटेड फॅट आणि कॅलरीज जास्त प्रमाणात असतात. जेव्हा तुम्ही जड जेवणानंतर लगेच आईस्क्रीम खाता, तेव्हा शरीराला एकाच वेळी अधिक कॅलरीज आणि साखरेवर प्रक्रिया करावी लागते. दिवसाच्या तुलनेत रात्री शरीराची चयापचय क्रिया किंचित मंदावते. ज्यामुळे शरीरात अतिरिक्त साखर आणि चरबी जमा होते. यामुळे रक्तातील साखर वेगाने वाढू शकते आणि नंतर काही वेळाने अचानक कमी होऊ शकते, ज्यामुळे रात्री उशिरा भूक लागते किंवा सुस्ती येते. रात्रीच्या जेवणानंतर दुधापासून बनवलेले आईस्क्रीम खाल्ल्याने पोट खराब होणे, गॅस, आम्लपित्त किंवा पोट फुगणे यांसारख्या समस्या उद्भवू शकतात. ज्यांना लॅक्टोजची ॲलर्जी आहे, त्यांच्यासाठी हे विशेषतः गंभीर असू शकते. डॉक्टरांच्या मते, जेवणानंतर लगेच खूप थंड पदार्थ खाल्ल्याने काही लोकांच्या पचनक्रियेवर परिणाम होऊ शकतो. तथापि, हा परिणाम प्रत्येक व्यक्तीनुसार बदलतो. चरबी आणि साखर पचनक्रिया मंद करू शकतात. आईस्क्रीममध्येही चरबी आणि साखर असते.

# वजन कमी करण्यास मदत करते सफरचंद!



## डॉक्टरांनी सांगितली, खाण्याची योग्य पद्धत...



**आजकाल कामाच्या ठिकाणी आणि घरी व्यस्त वेळापत्रकामुळे लोकांना स्वतःची काळजी घेण्यासाठी वेळ मिळत नाही. यामुळे लठ्ठपणा आणि वजन वाढू शकते. कामाच्या तणावामुळे लोक अनेकदा अस्वास्थ्यकर पदार्थ खातात, ज्यामुळे हळूहळू त्यांचे वजन वाढते आणि उच्च रक्तदाब आणि मधुमेहासारख्या इतर आजारांचा धोका वाढतो. वजनाच्या समस्यांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांनी सर्वप्रथम त्यांच्या आहारात सफरचंदांचा समावेश करायला हवा, असे डॉक्टरांचे म्हणणे आहे. हा निसर्गाचा एक आरोग्यदायी नाश्ता आहे, जो केवळ वजन नियंत्रित करण्यास मदत करत नाही, तर इतर अनेक फायदेही देतो. एका मध्यम आकाराच्या सफरचंदात अंदाजे ९५ कॅलरीज, ४ ग्रॅम फायबर आणि ८५% पेक्षा जास्त पाणी असते. या गुणधर्मांमुळे ते वजन कमी करण्यासाठी अनुकूल ठरते.**

### वजन कमी करण्यासाठी सफरचंदांचे फायदे

- फायबरयुक्त : सफरचंदात फायबरचे प्रमाण जास्त असते. त्यात पेक्टिन नावाचे सॉल्यूबल फायबर असते, जे वजन कमी करण्यास मदत करते. फायबर पचनक्रिया मंदावते आणि अन्न पोटात जास्त वेळ ठेवते, ज्यामुळे जेवणानंतर पोट भरल्यासारखे वाटते आणि ते जास्त वेळ टिकून राहते. तज्ज्ञांच्या मते, जेव्हा लोकांना जास्त वेळ पोट भरल्यासारखे वाटते, तेव्हा ते दिवसभरात अस्वास्थ्यकर पदार्थ खाण्याची किंवा अतिरिक्त कॅलरीज घेण्याची शक्यता कमी असते. सफरचंद हळूहळू ऊर्जा प्रदान करतात. शिवाय, फायबर आतड्यांच्या आरोग्यासाठी देखील चांगले आहे आणि पचनमार्गातील चांगल्या जीवाणूंना पोषण देते.
- कॅलरीजचे प्रमाण कमी असणे : वजन कमी करण्यासाठी कमी कॅलरी सेवन करण्याची शिफारस केली जाते. एखादी व्यक्ती दिवसभरात जेवढ्या कॅलरीज खर्च करते, त्यापेक्षा कमी कॅलरीजचे सेवन केल्याने वजन कमी होते. सफरचंदात नैसर्गिकरित्या कॅलरीज खूप कमी असतात. एका मध्यम आकाराच्या सफरचंदात अंदाजे ८०-१०० कॅलरीज असतात आणि ते पोट भरते व समाधान देते. लोकांनी सफरचंदाच्या रसाऐवजी संपूर्ण फळ खावे, कारण रसामुळे बहुतेक फायबर निघून जाते.
- पाण्याचे प्रमाण जास्त : वजन लवकर नियंत्रित करण्यासाठी हायड्रेशन (शरीरात पुरेसे पाणी असणे) महत्त्वाची भूमिका बजावते. सफरचंदात पाण्याचे प्रमाण जास्त असते, म्हणूनच ते खाल्ल्याने पोट भरल्यासारखे वाटते. सफरचंदामुळे एकूण कॅलरीचे सेवन कमी ठेवून पोट भरल्याची भावना येते. खरं तर, जेवणापूर्वी एक सफरचंद खाल्ल्याने भूक कमी होते आणि जास्त खाणे टाळता येते. उन्हाळ्यात डिहायड्रेशन (शरीरातील पाण्याची कमतरता) टाळण्यासही ते मदत करते.
- अस्वास्थ्यकर पदार्थ टाळण्यास मदत : बरेच लोक दिवसभरात भरपूर जेवण करण्याऐवजी अस्वास्थ्यकर स्नॅक्स खाऊन वजन वाढवतात. सफरचंद हे एक नैसर्गिक गोडवा देणारे फळ आहे आणि त्यात फायबर व पाणी असते. ज्यामुळे ते पॅकेज केलेल्या स्नॅक्सपेक्षा एक आरोग्यदायी पर्याय ठरते. तज्ज्ञांच्या मते, दिवसातून एका प्रक्रिया केलेल्या स्नॅकऐवजी संपूर्ण फळ खाल्ल्याने कालांतराने कॅलरीच्या सेवनावर लक्षणीय परिणाम होऊ शकतो. संपूर्ण सफरचंद खाल्ल्याने इतर अनारोग्यकारक पदार्थांची लालसा हळूहळू कमी होते आणि पोट भरलेले असल्याचा संकेत मेंदूला जास्त काळ मिळतो.
- अँटीऑक्सिडंट्सने समृद्ध : सफरचंद हे फायबर आणि हायड्रेशनचा चांगला स्रोत आहेत. त्यात फ्लेव्होनॉइड्स आणि पॉलीफेनॉलसारखे अँटीऑक्सिडंट्स देखील असतात. हे घटक ऑक्सिडेटिव्ह स्ट्रेसशी लढण्यास मदत करतात आणि चयापचय आरोग्य सुधारण्यात भूमिका बजावू शकतात. अँटीऑक्सिडंट्स थेट वजन कमी करण्यास मदत करत नाहीत, परंतु ते जुनाट दाह आणि चयापचय विकार कमी करण्यास मदत करतात, जे दोन्ही वजन नियंत्रणातील अडथळे मानले जातात. फळे, भाज्या आणि वनस्पतींनी समृद्ध आहार घेतल्याने चयापचय कार्य सुधारण्यास मदत होऊ शकते.

### आहारात सफरचंदांचा समावेश कसा करावा?

वजन कमी करण्यासाठी डॉक्टर सालीसकट सफरचंद खाण्याची शिफारस करतात. कारण सालीमध्ये फायबर आणि आरोग्यदायी वनस्पतीजन्य घटक असतात. सफरचंद सुकामेवा, बिया किंवा प्रथिनयुक्त पदार्थांसोबत खाल्ल्याने पोट जास्त वेळ भरलेले राहण्यास मदत होऊ शकते. थोडक्यात सांगायचे तर, वजन कमी करण्यासाठी सफरचंद हा काही जादुई उपाय नाही, परंतु संतुलित आहारात समाविष्ट करता येणाऱ्या सर्वात व्यावहारिक, स्वस्त आणि वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध झालेल्या पदार्थांपैकी तो एक आहे. नियमित व्यायाम, पुरेशी झोप आणि आरोग्यदायी खाण्याच्या सवयींसोबत, हे छोटे फळ तुम्हाला लवकर वजन कमी करण्यास मदत करू शकते.




# वारंवार पोटदुखी?

# तेलकट पदार्थ खाल्ल्यानंतर समस्या वाढत असेल तर असू शकते पित्ताशयातील खड्यांचे लक्षण!



**आजच्या जगात बहुतेक लोक आपल्या आहाराकडे योग्य लक्ष देत नाहीत. अनियमित खाण्याच्या सवयी आणि जीवनशैलीतील बदलांमुळे अपचन, गॅस, पोट फुगणे आणि पोटदुखी होऊ शकते. बहुतेक वेळा या समस्यांची सौम्य लक्षणे कालांतराने आपोआप बरी होतात. तथापि, जर तुम्हाला वारंवार पोटदुखीचा त्रास होत असेल, तर त्याकडे दुर्लक्ष करू नये. बऱ्याच प्रकरणांमध्ये, पोटदुखी हे पित्ताशयाच्या खड्यांचे लक्षण असू शकते. पित्ताशयाचे खडे हळूहळू तयार होतात आणि जेव्हा वेदना तीव्र होतात किंवा इतर संबंधित समस्या सुरू होतात, तेव्हाच ते लक्षात येतात. डॉक्टर असेही म्हणतात की, सर्वच पोटदुखी पित्ताशयाच्या खड्यांचे लक्षण नसते, परंतु सततच्या वेदनांसाठी वैद्यकीय सल्ला घेणे आवश्यक आहे, विशेषतः जर त्यामुळे तुमच्या दैनंदिन जीवनात अडथळा येत असेल.**

यकृताच्या खाली एक लहान अवयव असतो जो अन्नातील चरबी पचवण्यास मदत करतो. याला पित्ताशय म्हणतात. सध्या पित्ताशयातील खड्यांची नेमकी कारणे अज्ञात आहेत. तथापि, डॉक्टर त्यांचा संबंध कोलेस्ट्रॉलची अतिरिक्त पातळी, पित्ताचे अतिरिक्त उत्पादन आणि पित्ताशय योग्यरित्या रिकामे न होण्याशी जोडतात. जेव्हा पित्ताशयात खडे तयार होतात, तेव्हा ते पित्ताशयाच्या नलिकांमध्ये अडथळा निर्माण करतात. यामुळे पित्ताशयाच्या कार्यात अडथळा येतो, ज्यामुळे वारंवार किंवा सतत पोटदुखी होते. ही वेदना सहसा पोटाच्या वरच्या उजव्या भागात किंवा मध्यभागी जाणवते. तेलकट किंवा जड पदार्थ खाल्ल्यानंतर त्रास वाढू शकतो. काही लोकांना अधूनमधून वेदना होतात, तर काहींना कित्येक तास तीव्र वेदना जाणवू शकतात. वारंवार होणाऱ्या पोटदुखीकडे दुर्लक्ष केल्यास निदानास विलंब होऊ शकतो आणि सूज किंवा संसर्गासारख्या गुंतागुंतीचा धोका वाढू शकतो.



### सामान्य लक्षणे कोणती?

पित्ताशयाच्या खड्यांमुळे पोटदुखीव्यतिरिक्त इतरही विविध लक्षणे दिसू शकतात. तथापि, या लक्षणांकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते. यामध्ये मळमळ, उलट्या, पोट फुगणे, अपचन आणि जेवणानंतर अस्वस्थता यांचा समावेश होतो. काही प्रकरणांमध्ये, वेदना पाठीपर्यंत किंवा उजव्या खांद्यापर्यंत पसरू शकतात. ताप, थंडी वाजणे किंवा त्वचा आणि डोळे पिवळे पडणे ही एका गंभीर स्थितीची चिन्हे असू शकतात. ज्यामुळे पित्ताशयातील खड्यामुळे अडथळा किंवा संसर्ग होत असल्याचे सूचित होते. वारंवार होणारी पोटदुखी आणि पचनातील सततची अस्वस्थता याकडे पोटाच्या सामान्य समस्या म्हणून दुर्लक्ष करू नये, विशेषतः जर लक्षणे अनेक दिवस टिकून राहिली किंवा वारंवार उद्भवली तर.

### पोटदुखी गंभीर लक्षण कधी मानले जाते?

जेव्हा एखाद्या व्यक्तीला सतत पोटदुखीचा त्रास होतो किंवा त्यासोबत ताप, उलट्या, कावीळ किंवा खाण्यास त्रास होणे यांसारखी लक्षणे दिसतात, तेव्हा पित्ताशयाचे खडे गंभीर मानले जातात. याव्यतिरिक्त, जर वेदना अचानक तीव्र झाल्या आणि त्यात सुधारणा झाली नाही, तर व्यक्तीने ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. पित्ताशयाच्या खड्यांमुळे कधीकधी पित्ताशयाचा संसर्ग, पित्तवाहिनीमध्ये अडथळा किंवा स्वादुपिंडाला सूज येणे यांसारख्या गुंतागुंती निर्माण होऊ शकतात. या स्थितींवर त्वरित उपचार करणे आवश्यक आहे. वैद्यकीय सल्ला घेण्यास उशीर केल्यास स्थिती बिघडू शकते आणि उपचारांचा कालावधी वाढू शकतो. वेदनेचे स्वरूप आणि तीव्रता याकडे लक्ष दिल्यास पित्ताशयाचे खडे लवकर ओळखण्यास मदत होऊ शकते.

### कोणते उपाय करावेत?

- आपल्या शरीराचे वजन नियंत्रणात ठेवा.
- फळे, भाज्या आणि फायबरयुक्त आहार घेण्यास सुरुवात करा.
- तेलकट आणि प्रक्रिया केलेल्या पदार्थांचे अतिसेवन टाळा.
- सक्रिय राहा आणि दररोज व्यायाम करा.
- पचनक्रिया व्यवस्थित ठेवण्यासाठी भरपूर पाणी प्या.
- दीर्घकाळ उपाशी राहणे टाळा, कारण अनियमित खाण्याच्या सवयींमुळे पित्ताशयाच्या खड्यांचा धोका वाढू शकतो.
- नियमित आरोग्य तपासणीमुळे कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रणात ठेवण्यास मदत होते.
- अयोग्य आहार आणि जीवनशैलीच्या सवयींमुळे पित्ताशयाच्या खड्यांचा धोका वाढतो. जर तुम्हाला वारंवार पोटदुखीचा त्रास होत असेल, तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. त्यामागील मूळ कारण शोधण्यासाठी त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्या.

# राज्यातील १४ बड्या आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

**मुंबई(प्रतिनिधी)**–राज्यातील १४ बड्या आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. पोलीस अधिकारी विश्वास नांगरे पाटील यांची बदली झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विश्वास नांगरे पाटील यांच्यावर नागपूर पोलीस आयुक्तपदाची जबाबदारी सोपवली आहे. विश्वास नांगरे पाटील सध्या मुंबईत लाचलुचपत प्रतिबंधक विभागात अतिरिक्त पोलीस महासंचालक म्हणून कार्यरत होते. दुसरीकडे नागपूरचे पोलीस आयुक्त रविंद्र सिंघल यांना विश्वास नांगरे पाटील कार्यरत असलेल्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागात महासंचालक म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे.

**पोलीस महासंचालक:** संजय वर्मा: पोलीस महासंचालक, न्यायिक व तांत्रिक येथून पोलीस महासंचालक, पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ पदी बदली. अर्चना त्यागी: पोलीस महासंचालक, पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ येथून पोलीस महासंचालक, न्यायिक व तांत्रिक पदी बदली.

**अपर पोलीस महासंचालक:** विश्वास नांगरे पाटील: अपर पोलीस महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथून पोलीस आयुक्त, नागपूर शहर पदी बदली. रवींद्र सिंघल: पोलीस आयुक्त, नागपूर शहर येथून अपर पोलीस महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पदी बदली.

**विशेष पोलीस महानिरीक्षक/पोलीस उपमहानिरीक्षक:** दत्तात्रय शिंदे: अपर पोलीस आयुक्त, मिरा- भाईंदर वसई-विरार येथून पोलीस महानिरीक्षक, राज्य गुन्हे अभिलेख विभाग, पुणे पदी पदोन्नतीने नियुक्ती. संजय शित्रे: पोलीस उप महानिरीक्षक, सायबर मुंबई येथून अपर पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर वसई-विरार आयुक्तालय पदी बदली.

**पोलीस अधीक्षक/पोलीस उपायुक्त:** प्रशांत मोहिते: पोलीस उपायुक्त, छ. संभाजीनगर शहर येथून पोलीस उपायुक्त, डायल ११२, नवी मुंबई पदी बदली १४. नीलाभ रोहन: पोलीस अधीक्षक, हिंगोली येथून पोलीस अधीक्षक, नांदेड पदी बदली. अभिनाश कुमार: पोलीस अधीक्षक, नांदेड येथून पोलीस उपायुक्त, पुणे शहर पदी बदली १४. श्रेणिक लोढा: अपर पोलीस अधीक्षक, खामगाव (बुलढाणा) येथून पोलीस अधीक्षक, हिंगोली पदी बदली. रुपाली आंबुरे: पोलीस उपायुक्त, डायल ११२, नवी मुंबई येथून पोलीस अधीक्षक, महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ पदी बदली. शशिकांत सातव: पोलीस उपायुक्त, नागपूर शहर येथून पोलीस उपायुक्त, छ. संभाजीनगर शहर पदी बदली. रमेश धुमाळ: पोलीस उपायुक्त, अमरावती शहर येथून पोलीस उपायुक्त, नागपूर शहर पदी बदली. पीयुष जगताप: समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १७, चंद्रपूर येथून अपर पोलीस अधीक्षक, खामगाव (बुलढाणा) पदी बदली. नारायण शिरगावंकर: समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १३, गडचिरोली येथून समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १९, कुसळगाव (अहिल्यानगर)- पदी बदली. प्रांजली सोनावणे: पोलीस अधीक्षक, गुअवि, अमरावती येथून पोलीस उपायुक्त, अमरावती शहर पदी बदली.

**वरिष्ठ समय श्रेणीत पदोन्नती:** नवदीप अग्रवाल: अपर पोलीस अधीक्षक, वाशिम येथून मा. राज्यपाल यांचे परिसहायक पदी पदोन्नतीने नियुक्ती.

# महावितरणने जनजागृती करण्याची मागणी; नागरिकांचा अजूनही स्मार्ट मीटरला विरोध

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)**– स्मार्ट मीटरविषयी ग्राहकांत अजूनही संभ्रमावस्था आहे. तेव्हा महाचितरणने स्मार्ट मीटर संदर्भात जनजागृती करावी, असे निर्देश ऊर्जा मंत्री हेमंत कपाडिया यांनी दिले.

सर्वसामान्य वीज ग्राहकाने स्मार्ट मीटर बसवावे किंवा नाही. हा त्याचा ऐच्छिक विषय आहे. विधानसभेत राज्याचे मुख्यमंत्री तसेच ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्मार्ट मीटर बसवून घ्यावा किंवा नाही हा ग्राहकांच्या इच्छेचा आहे. 'महावितरण'तर्फे ग्राहकांना पाठविलेल्या मेसेजमध्ये केंद्रीय वीज नियामक आयोगाच्या निर्णयाची माहिती दिली जात आहे. हा आदेश नव्हे हे दिशानिर्देश आहेत. राज्य वीज नियामक आयोगाने स्मार्ट मीटरबाबत कोणताही निर्णय दिलेला नाही. यामुळे स्मार्ट मीटर बसविण्याची सक्ती महावितरणने करू नये. स्मार्ट मीटरबाबत जनजागृती करावी. लोकांच्या शंका दूर करून स्मार्ट मीटर त्यांच्या परवानगीने बसविण्यात यावे, अशी माहिती ऊर्जा मंचाचे हेमंत कपाडिया यांनी दिली.

# प्रियकराच्या मदतीने होणाऱ्या नवऱ्याला लोहगडच्या ट्रेकिंगला नेऊन दरीत ढकलून खून

**पुणे (प्रतिनिधी)**– पुण्याच्या लोहगड किल्ल्यावर ट्रेकिंगला गेलेल्या एका प्रसिद्ध उद्योजकाच्या मुलाचा पाय घसरून दरीत पडून मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली होती. सुरुवातीला हा निव्वळ एक अपघात वाटत असतानाच, आता पुणे पोलिसांच्या तपासात एक अत्यंत खळबळजनक आणि थरारक खुलासा झाला आहे. हा अपघात नसून, होणाऱ्या पत्नीनेच आपल्या प्रियकराच्या मदतीने रचलेला हा एक थंड डोक्याने केलेला 'मर्डर प्लॅन' असल्याचे तपासांती निष्पन्न झाले असल्याचे पोलीस सूत्राने सांगितले.

कोट्यधीश कुटुंबातील लग्नाची तयारी सुरू असताना, प्रेमातील अडसर दूर करण्यासाठी सिया गोयल आणि तिचा प्रियकर चेतन चौधरी या दोघांनी मिळून केतन अगरवालची लोहगड किल्ल्यावरून दरीत ढकलून हत्या केली.

अगरवाल बिल्डर्सचे सुपुत्र केतन अगरवाल यांचा साखरपुडा सिया गोयलसोबत झाला होता. नोव्हेंबर महिन्यात जयपूरमधील १४ कोटींच्या भव्य पॅलेसमध्ये हे लग्न होणार होते. वऱ्हाडी मंडळींसाठी दोन विमाने देखील बुक करण्यात आली होती.

एकीकडे लग्नाची थाटामाटात तयारी सुरू असताना, दुसरीकडे सिया तिच्या कॉलेज काळातील प्रियकर चेतन चौधरीसोबत केतनच्या हत्येचा कट रचत होती. केतनला ट्रेकिंगची आवड होती. त्यामुळे आधी विश्वास जिंकण्यासाठी सिया केतनसोबत लोहगडावर ट्रेकिंगला जाऊन आली होती. दरम्यान, केतन आणि सियाचे बाली येथे प्री-वेडिंग शूट ठरले होते. मात्र, केतनशी लग्नच करायचं नसल्यानं सियाने केतनचा पासपोर्ट लपवला, ज्यामुळे मुंबई विमानतळावरून त्यांना बालीचा दौरा रद्द करावा लागला. बाली दौरा रद्द झाल्यानंतर, सियाने केतनसोबत कडाक्याचं भांडण केलं. अखेर सियाचा हट्ट पुरवण्यासाठी आणि तिचा वाढदिवस साजरा करण्यासाठी केतन पुन्हा लोहगडावर ट्रेकिंगसाठी तयार झाला. कटानुसार प्रियकर चेतन चौधरी देखील लोहगडावर पोहोचला. याच दरम्यान त्याला ढकलून देण्यात आल्याचे निष्पन्न झाले.

# समृद्धी महामार्गावर फॉर्च्यूनरचा भीषण अपघात; कारमधील पती-पत्नी जागीच ठार, ड्रायव्हरसह २ लहान मुलं गंभीर

**बुलढाणा (प्रतिनिधी)** – राज्यातील अपघाताच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असून कालच बदलापूरमधील भीषण अपघाताची घटना समोर आली होती. तर, समृद्धी महाम ार्गावरील अपघाताच्या घटना देखील नेहमीच समोर येत आहेत. आता, पुन्हा एकदा समृद्धी महामार्गावर झालेल्या भीषण अपघातात पती-पत्नी जागीच ठार झाले असून दोन लहान मुले जखमी आहेत. यासह, कारचा चालक देखील गंभीर जखमी असल्याची माहिती आहे. समृद्धी महामार्गावरील दुसरबीड जवळ ही दुर्घटना घडली.

समृद्धी महामार्गावरील दुसरबीड जवळ भरधाव फॉर्च्यूनर कारने समोर धावणाऱ्या ट्रेलरला पाठीमागून धडक दिल्याने भीषण अपघात झाला. या अपघातात छत्रपती संभाजीनगर येथील पती-पत्नी जागीच ठार झाले असून कारमधील दोन चिमुरडे आणइ कार चालक गंभीर जखमी झाला आहे. जखमींना जालना येथे रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे. डॉ. सय्यद आसिफ सय्यद उमर हे आपल्या पत्नी गुलसीतान बी आणि कुटुंबासह नागपूरवरून संभाजीनगरच्या दिशेने जात होते. मात्र, समोर धावणाऱ्या ट्रकला त्यांच्या फोर्च्यूनर कारने अनियंत्रित होऊन धडक दिली. या धडकेत डॉ. सय्यद आसिफसह पत्नी गुलसितान बी हे दोघे पती-पत्नी जागीच ठार झाले असून त्यांच्या गाडीचा चालक आणि दोन लहान मुले जखमी झाले आहेत. हे कुटुंब नागपूरवरून संभाजीनगर छत्रपती संभाजी नगरच्या दिशेने जात होते.

नमुना ई-४ (नियम १९ पहा)

**निवडणूक निर्णय अधिकारी :- होनराव एन.एस.,सहकार अधिकारी श्रेणी-१,सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,ता.मुखेड**

**सहकारी संस्थेचे नांव:- वि.का.ग्रामोद्योग संघ म.मुखेड, ता.मुखेड,जि.नांदेड**

महाराष्ट्र सहकारी संस्था निवडणूक नियम २०१४ च्या नियम १९ प्रमाणे अधिकाराचा वापर करुन आणि मा.राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी जाहीर केलेल्या उपरोक्त सहकारी संस्थेच्या सदस्यांची सन २०२६ ते २०३१ या कालावधीची निवडणूक घेणेकरीता मी होनराव एन.एस.,सहकार अधिकारी श्रेणी-१,सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,ता.मुखेड,मा.जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी, नांदेड आणि मा.राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,म.रा.पुणे यांच्या मान्यतेने वि.का.ग्रामोद्योग संघ म.मुखेड, ता.मुखेड,जि.नांदेड यांच्या समितीच्या सदस्यांची निवडणूक घेण्याकरीता नियुक्त केलेला निवडणूक निर्णय अधिकारी. याव्दारे वि.का.ग्रामोद्योग संघ म.मुखेड, ता.मुखेड,जि.नांदेड म्हणून ओळखल्या जाणा-या सहकारी संस्थेच्या समितीच्या सदस्यांची निवड करण्यासाठी निवडणूकीच्या कार्यक्रमातील विविध टप्पे तयार करुन जाहीर करीत आहोत आणि या सोबत जोडलेल्या अनुसुचीच्या स्तंभ-२ विनिर्दिष्ट केलेल्या मतदार संघांच्या किंवा मतदारसंघांच्या संबंधातील निवडणूक नियत करीत आहोत.

| अ.क्र | मतदार संघाचे नांव | | अंतिम मतदार यादी दिनांक | नामनिर्देशनपत्र दाखल करण्यासाठीचा शेवटचा दिनांक (ज्या जागी नामनिर्देशनपत्रे मिळतील ती जागा) | नामनिर्देशन पत्राची यादीचे प्रकाशन | नामनिर्देशनपत्राच्या छाननीचा दिनांक | विधीग्राहय नामनिर्देशन पत्रांची सुची प्रसिध्द करण्याचा दिनांक | उमेदवाराने नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याचा दिनांक | उमेदवारांना निशाणीचे वाटप व अंतिम यादीचे प्रकाशन | मतदान ज्या दिनांकास घेण्यात येईल तो दिनांक वेळ व मतदानाचे स्थळ | मतमोजणी दिनांक,वेळ व स्थळ | मतदानाचे निकाल घोषित करण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | सर्वसाधारण कारागीर | ६ | दि.०५.०६.२०२६ | दि.२४.०६.२०२६ ते ०१.०७.२०२६ सकाळी ११ ते दुपारी ३ वाजे पर्यंत सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था.ता.मुखेड.यांचे कार्यालयात (सुटीचे दिवस वगळून) | दि.२४.०६.२०२६ ते ०१.०७.२०२६ जसे अर्ज प्राप्त होतील त्याप्रमाणे रोज सायंकाळी ४.०० वाजता सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,तालुका मुखेड, यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डावर | दि.०२.०७.२०२६ रोजी सकाळी ११ वाजेपासून संपेपर्यत सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,ता.मुखेड यांचे कार्यालयात | दि.०३.०७.२०२६ सकाळी ११ वाजता सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,ता.मुखेड कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर | दि.०३.०७.२०२६ ते १७.०७.२०२६ पर्यंत सकाळी ११ ते दुपारी ३ वाजे पर्यंत सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,तालुका मुखेड यांचे कार्यालयात (सुटीचे दिवस वगळून) | दि.२०.०७.२०२६ सकाळी ११.३० वाजता सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था. ता.मुखेड यांचे कार्यालयात | दिनांक ०२.०८.२०२६ वेळ सकाळी ८ ते सायं.४ वाजेपर्यंत स्थळ:- जि.प.हा.मुलींचे मुखेड,ता. मुखेड,जि.नांदेड | दिनांक ०२.०८.२०२६ मतदान संपल्यानंतर लगेच स्थळ:- जि.प.हा.मुलींचे मुखेड,ता. मुखेड,जि.नांदेड | दिनांक ०२.०८.२०२६ मतमोजणी संपल्यानंतर लगेच स्थळ:- जि.प.हा.मुलींचे मुखेड,ता. मुखेड,जि.नांदेड |
| २ | अनुसुचित जाती/जमाती | १ | | | | | | | | | | |
| ३ | वि.जा/ज.भ.वि.जा/ ज.किंवा वि.मा.प्र. | १ | | | | | | | | | | |
| ४ | इतर मागासवर्गीय | १ | | | | | | | | | | |
| ५ | महीला राखीव | २ | | | | | | | | | | |
| | एकुण | ११ | | | | | | | | | | |

टिप:-१.स्तंभ क्र.७ व ९ मध्ये विनिर्दिष्ट केलेली यादी सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था, ता.मुखेड,जि.नांदेड यांचे कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द केली जाईल. २.मतदार यादी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात विकत मिळेल. ३.नोटीसबोर्डावर प्रसिध्द केलेल्या चिन्हांच्या यादीमधून चिन्हे निवडावयाचे आहेत.४.निवडणूक चिन्हांचे वाटप स्तंभ ९ मधील तारखेस व ठिकाणी सकाळी ११.३० वाजता करण्यात येईल. ५.नामनिर्देशन पत्राची छाननी केल्यानंतर यादी प्रसिध्दी,मतदान व मतमोजणी दिवस वगळून निवडणूक कार्यक्रम शासकीय/सार्वजनिक सुटया खेरीज सुरु राहील. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाचा पत्ता:- सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,ता.मुखेड,जि.नांदेड पोस्ट ऑफीसच्या पाठीमागे मोंढा मुखेड

(होनराव एन.एस.)
**निवडणूक निर्णय अधिकारी**
**वि.का.ग्रामोद्योग संघ म.मुखेड,ता.मुखेड**

**जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा,जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,नांदेड**

**सचिव,**
**राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,म.राज्य,पुणे**

नमुना ई-४ (नियम १९ पहा)

**निवडणूक निर्णय अधिकारी :- होनराव एन.एस.,सहकार अधिकारी श्रेणी-१,सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,ता.मुखेड**

**सहकारी संस्थेचे नांव:- वि.का.ग्रामोद्योग संघ म.मुखेड, ता.मुखेड,जि.नांदेड**

महाराष्ट्र सहकारी संस्था निवडणूक नियम २०१४ च्या नियम १९ प्रमाणे अधिकाराचा वापर करुन आणि मा.राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी जाहीर केलेल्या उपरोक्त सहकारी संस्थेच्या सदस्यांची सन २०२६ ते २०३१ या कालावधीची निवडणूक घेणेकरीता मी होनराव एन.एस.,सहकार अधिकारी श्रेणी-१,सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,ता.मुखेड,मा.जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी, नांदेड आणि मा.राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,म.रा.पुणे यांच्या मान्यतेने वि.का.ग्रामोद्योग संघ म.मुखेड, ता.मुखेड,जि.नांदेड यांच्या समितीच्या सदस्यांची निवडणूक घेण्याकरीता नियुक्त केलेला निवडणूक निर्णय अधिकारी. याव्दारे वि.का.ग्रामोद्योग संघ म.मुखेड, ता.मुखेड,जि.नांदेड म्हणून ओळखल्या जाणा-या सहकारी संस्थेच्या समितीच्या सदस्यांची निवड करण्यासाठी निवडणूकीच्या कार्यक्रमातील विविध टप्पे तयार करुन जाहीर करीत आहोत आणि या सोबत जोडलेल्या अनुसुचीच्या स्तंभ-२ विनिर्दिष्ट केलेल्या मतदार संघांच्या किंवा मतदारसंघांच्या संबंधातील निवडणूक नियत करीत आहोत.

| अ.क्र | मतदार संघाचे नांव | | अंतिम मतदार यादी दिनांक | नामनिर्देशनपत्र दाखल करण्यासाठीचा शेवटचा दिनांक (ज्या जागी नामनिर्देशनपत्रे मिळतील ती जागा) | नामनिर्देशन पत्राची यादीचे प्रकाशन | नामनिर्देशनपत्राच्या छाननीचा दिनांक | विधीग्राहय नामनिर्देशन पत्रांची सुची प्रसिध्द करण्याचा दिनांक | उमेदवाराने नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याचा दिनांक | उमेदवारांना निशाणीचे वाटप व अंतिम यादीचे प्रकाशन | मतदान ज्या दिनांकास घेण्यात येईल तो दिनांक वेळ व मतदानाचे स्थळ | मतमोजणी दिनांक,वेळ व स्थळ | मतदानाचे निकाल घोषित करण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | सर्वसाधारण कारागीर | ६ | दि.०५.०६.२०२६ | दि.२४.०६.२०२६ ते ०१.०७.२०२६ सकाळी ११ ते दुपारी ३ वाजे पर्यंत सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था.ता.मुखेड.यांचे कार्यालयात (सुटीचे दिवस वगळून) | दि.२४.०६.२०२६ ते ०१.०७.२०२६ जसे अर्ज प्राप्त होतील त्याप्रमाणे रोज सायंकाळी ४.०० वाजता सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,तालुका मुखेड, यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डावर | दि.०२.०७.२०२६ रोजी सकाळी ११ वाजेपासून संपेपर्यत सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,ता.मुखेड यांचे कार्यालयात | दि.०३.०७.२०२६ सकाळी ११ वाजता सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,ता.मुखेड कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर | दि.०३.०७.२०२६ ते १७.०७.२०२६ पर्यंत सकाळी ११ ते दुपारी ३ वाजे पर्यंत सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,तालुका मुखेड यांचे कार्यालयात (सुटीचे दिवस वगळून) | दि.२०.०७.२०२६ सकाळी ११.३० वाजता सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था. ता.मुखेड यांचे कार्यालयात | दिनांक ०२.०८.२०२६ वेळ सकाळी ८ ते सायं.४ वाजेपर्यंत स्थळ:- जि.प.हा.मुलींचे मुखेड,ता. मुखेड,जि.नांदेड | दिनांक ०२.०८.२०२६ मतदान संपल्यानंतर लगेच स्थळ:- जि.प.हा.मुलींचे मुखेड,ता. मुखेड,जि.नांदेड | दिनांक ०२.०८.२०२६ मतमोजणी संपल्यानंतर लगेच स्थळ:- जि.प.हा.मुलींचे मुखेड,ता. मुखेड,जि.नांदेड |
| २ | अनुसुचित जाती/जमाती | १ | | | | | | | | | | |
| ३ | वि.जा/ज.भ.वि.जा/ ज.किंवा वि.मा.प्र. | १ | | | | | | | | | | |
| ४ | इतर मागासवर्गीय | १ | | | | | | | | | | |
| ५ | महीला राखीव | २ | | | | | | | | | | |
| | एकुण | ११ | | | | | | | | | | |

टिप:-१.स्तंभ क्र.७ व ९ मध्ये विनिर्दिष्ट केलेली यादी सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था, ता.मुखेड,जि.नांदेड यांचे कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द केली जाईल. २.मतदार यादी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात विकत मिळेल. ३.नोटीसबोर्डावर प्रसिध्द केलेल्या चिन्हांच्या यादीमधून चिन्हे निवडावयाचे आहेत.४.निवडणूक चिन्हांचे वाटप स्तंभ ९ मधील तारखेस व ठिकाणी सकाळी ११.३० वाजता करण्यात येईल. ५.नामनिर्देशन पत्राची छाननी केल्यानंतर यादी प्रसिध्दी,मतदान व मतमोजणी दिवस वगळून निवडणूक कार्यक्रम शासकीय/सार्वजनिक सुटया खेरीज सुरु राहील. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाचा पत्ता:- सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,ता.मुखेड,जि.नांदेड पोस्ट ऑफीसच्या पाठीमागे मोंढा मुखेड

(होनराव एन.एस.)
**निवडणूक निर्णय अधिकारी**
**वि.का.ग्रामोद्योग संघ म.मुखेड,ता.मुखेड**

**जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा,जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,नांदेड**

**सचिव,**
**राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,म.राज्य,पुणे**

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

## E-TENDER NOTICE

**Invitation for Bids, E-Tender Notice T-07**

The Superintending Engineer (O&M Circle, Nanded) on behalf of MSEDCL (Employer) invites the bids from reputed agencies for E-Tender **"Work of Preventive Maintenance of sub-stations under O&M Circle Nanded**

**SE/NDC/TS/2026-27/T-07 of Rs. 80 Lakhs**

The Tenders will be processed only in Electronic Tendering mode and open for registered contractors on e-Tendering system for work contracts of MSEDCL. Tender documents can be downloaded from employer's website site https://etender.mahadiscom.in/eatApp/ up to **Dt.29.06.2026** after payment of E-tender fees online. For more details, please contact Ex. Engineer (Adm), Nanded Circle. **Mob. No: 7558376333**

This office reserves all the right to reject any or all the offers without assigning any reason thereof.

**PRO No32/2026-27**
**dt.22.6.26**

**Superintending Engineer**
MSEDCL, Circle Office Nanded.

## Change In Name

(Old Name) is Vaijnath Virbhadrappa Pasarge, Which Now I and Changing as (New Name) Vaijnath Virbhdrappa Pasarge, Hence, forth my all correspondence will be done as per my New Name. Please Consider the same. Sign by-Vaijnath Virbhdrappa Pasarge, BRJ Tower, Flat No. 9, Sarpanch Nagar, Malegaon Road, Taroda (Khu.) Nanded(MS).
Mob. No.9404667031

## Change In Name

(Old Name) is Asha Vaijnath Pasarge, Which Now I and Changing as (New Name) Asha Narayanrao Shete, Hence, forth my all correspondence will be done as per my New Name. Please Consider the same. **Sign by-** Asha Narayanrao Shete, W/o, Vaijnath Pasarge, BRJ Tower, Flat No. 9, Sarpanch Nagar, Malegaon Road, Taroda (Khu.) Nanded(MS).
Mob. No.9404667032

## जाहीर प्रगटन

मला माझे पक्षकाराने दिलेल्या माहिती व अधिकारावरुन मी खालील प्रमाणे जाहीर प्रगटन देत आहे की, माझे पक्षकार शंकर दादाराव जाधव रा. किरोडा ता. लोहा जि. नांदेड यांनी १. शांताबाई बालाजी गव्हाणे २. कांताबाई बालाजी पतलावे ३. मिनाबाई बालाजी कल्लाळे ४. सुरेखाबाई संभाजी घोगरे ५. श्वेता बालाजी घोरे यांच्या कडून सौदाचिठ्ठी आधारे खरेदी केलेला जमीन जी मौजे वाघाळा ता.जि. नांदेड येथील शेत गट क्र. १५७ पैकी विक्री क्षेत्र ० हे ३० आर ज्याचा फेर क्र. ७०५५ असून त्याचा खाते क्र. १८९ आहे ज्याची चतु:सिमा पुर्वेस असदवन ला जाणारा ६० फुटाचा रोड, पश्चिमेस- सुनिल संभाजी घोगरे यांची जमीन, दक्षिणेस- किशन रामजी इंगेवाड यांची जमीन आणि उत्तरेस- भुजंगराव पुंडलीकराव हंबर्डे व गंगाधरगंगना सायनोड यांची जमीन आहे. येणे प्रमाणे सदरील चतु:सिमेच्या आतील वरील वर्णनाची जमीन माझे पक्षकार यांनी खरेदी करण्याचा करार केला असून करारापोटी बयाना रक्कमही दिलेली आहे.

तरी सर्व जनतेस व संबंधीतांना कळविण्यात येते की, वरील खरेदी विक्रीच्या व्यवहारास कोणाची कांही उज़र अथवा आक्षेप, न्यायालयीन वाद, कर्जबोजा, वारस, दानपत्र, मृत्युपत्र, खंडनामा इत्यादी असेल तर त्यांनी ८ दिवसाचे आत संबंधीत मुळ कागदपत्रासह आपला लेखी उजर खालील पत्यावर नोंदवावा. मुदतीनंतर आलेला उजर किंवा आक्षेप माझे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही. मुदतीत उजर, आक्षेप न आल्यास, वरील खरेदी विक्रीच्या व्यवहारास कोणाचा कांही आक्षेप किंवा उजर नाही असे समजुन सदरील खरेदी विक्रीचा व्यवहार माझे पक्षकार पुर्ण करतील याची नोंद संबंधीताने घ्यावी. करिता जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

मार्फत
अॅड. डी.एम. सोनकुलवार
नांदेड
मो.नं. ९५५२७४५४७४

जाहीर प्रगटन देणार
शंकर दादाराव जाधव
रा. किरोडा ता. लोहा जि. नांदेड
मो. ९७६६९०८८५५
सदाशिव कदम चामणीकर
मो. ९५४५४३९५५५

## टी.सी. हरवली

माझी शेख यासीन मगदूम रा. घुंगराळा ता. नायगाव, जि. नांदेड या नावाची इयत्ता १२ वी पासची टी. सी. घुंगराळा ते नांदेड बस प्रवासात हरवली आहे. कुणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा. **संपर्क पत्ता** – शेख यासीन मगदूम, रा. घुंगराळा ता.नायगाव (खै) जि. नांदेड मो. ८८०६९४७२७८

## टी.सी. हरवली

माझी कु. श्रावणी ज्ञानेश्वर चिद्रावार या नावाची इयत्ता दहावी पासची टी. सी. वजिराबाद नांदेड ते हडको ऑटोने प्रवास करीत असताना बॅग हरवली असून, बॅगमध्ये टी. सी. व कागदपत्रे हरवली आहेत. कोणास सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा. **संपर्क पत्ता**– हडको दत्त मंदिर एन.डी. ३१ नवीन नांदेड.
मो. ९११२९०३६७४

## Change In Name

My Old Name is PATIL BHAKTI RAMESHRAO which now I am changing as New Name PATIL BHAKTI RAMESH. Henceforth all my correspondence will be done as per my new name. Please consider the same. CONTACT- PATIL BHAKTI RAMESH D/O RAMESH PATIL ND 42, Sai Baba Nagar, Hudco, Nanded – 431603, Maharashtra
CONTACT NO.: 8600394867

कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




# महापालिकेत शहर टास्क फोर्स कमिटीची बैठक संपन्न

## पल्स पोलिओ मोहीम व अतिसार नियंत्रण पंधरवडा संदर्भात महापौर व आयुक्तांनी घेतला संयुक्त आढावा

**नांदेड (प्रतिनिधी) –** 'शून्य बालमृत्यूचे ध्येय आणि पोलिओमुक्त भारताचा संकल्प' सुरक्षित ठेवण्यासाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका क्षेत्रात येत्या रविवार, दि. २८ जून रोजी राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे 'स्टॉप डायरिया कॅम्पेन' (अतिसार नियंत्रण पंधरवडा) शहरात प्रभावीपणे राबवण्यासाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या शहर कार्य बल गटाची विशेष आढावा बैठक दि.२३ जून रोजी मनपा स्थायी समिती बैठक कक्षात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत महापौर कविता संतोष मुळे आणि पालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी आरोग्य विभागाच्या तयारीचा सविस्तर आढावा घेतला व अधिकाऱ्यांना महत्त्वपूर्ण निर्देश दिले.



पल्स पोलिओ मोहीम संबंध देशभरासह नांदेड शहरात सुध्दा आगामी २८ जून रोजी राबवली जाणार असून, ० ते ५ वर्षे वयोगटातील एकही बालक लस घेण्यापासून दुर्लक्षित राहणार नाही याची दक्षता घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या राष्ट्रीय मोहिमेअंतर्गत नांदेड मनपा क्षेत्रातील ० ते ५ वर्षांखालील ९२, ८४५ बालकांना पोलिओ प्रतिबंधक डोस देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात असून, या मोहिमेसाठी शहरात एकूण २८५ पोलिओ बुथ निश्चित करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे प्रवासात असलेल्या किंवा दुर्गम भागात राहणाऱ्या बालकांपर्यंत पोहोचण्यासाठी एकूण ६३ विशेष ट्रान्झिट पथके सज्ज करण्यात आली आहेत. मोहिमेच्या पहिल्या दिवशी (२८ जून) जे बालक बुथवर येऊ शकणार नाहीत, त्यांच्यासाठी पुढील काही दिवस घरोघरी भेट देऊन एकूण १८० आयपीपीआय टीममधील आरोग्य कर्मचारी, अंगणवाडी सेविका आणि आशा स्वयंसेविका घरोघरी जाऊन वंचित बालकांना पोलिओचे थेंब पाजतील. त्याचप्रमाणे शहरातील रेल्वे स्टेशन, बसस्थानक, बाजारपेठा, मुख्य चौक येथे लसीकरण करण्यासाठी एकूण १३ मोबाईल टीम स्थापित केल्या जाणार आहेत.

त्याचप्रमाणे स्टॉप डायरिया कॅम्पेन (अतिसार नियंत्रण) मोहिमेअंतर्गत बालकांमधील पाण्याचे प्रमाण कमी होऊन होणारे मृत्यू रोखण्यासाठी शहरात अतिसार नियंत्रण पंधरवडा प्रभावीपणे राबवला जाईल. या मोहिमेत आशा स्वयंसेविकांमार्फत ५ वर्षांखालील मुलांच्या घराघरांमध्ये ओआरएस पाकिटे आणि झिंक गोळ्यांचे पूर्व-नियोजित वाटप केले जाईल. शहरातील झोपडपट्ट्या, हाय-रिस्क एरिया, बांधकाम साईट्स आणि स्थलांतरित नागरिकांच्या वस्त्यांवर विशेष लक्ष केंद्रित करून मायक्रो प्लॅन तयार करण्यात आला आहे. मनपाच्या सर्व नागरी आरोग्य केंद्रांवर, रुग्णालयांमध्ये आणि ओपीडीमध्ये 'ओआरएस-झिंक कॉर्नर्स' सुरू करण्यात येतील. तसेच शुद्ध पिण्याचे पाणी, स्वच्छता आणि हात धुण्याच्या योग्य सवयींबाबत शाळा, अंगणवाड्या आणि सार्वजनिक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर जनजागृती केली जाणार आहे.

बैठकीत बोलताना महापौर सौ.कविता मुळे यांनी सांगितले की, पोलिओ निर्मूलनाचे यश टिकवून ठेवण्यासाठी शहरातील एकही बालक लसीकरणापासून दुर्लक्षित राहू नये याची प्रशासनाने काळजी घ्यावी. मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी स्पष्ट केले की, मुलाने नियमित लसीकरणातील सर्व पोलिओ डोस घेतले असले, तरीही या राष्ट्रीय मोहिमेतील अतिरिक्त डोस देणे त्यांच्या आरोग्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे शहरातील सर्व नागरिकांनी, स्वयंसेवी संस्थांनी आणि पालकांनी २८ जून रोजी आपल्या ५ वर्षांखालील प्रत्येक बालकाला आपल्या जवळच्या केंद्रात नेऊन पोलिओ डोस नक्की पाजवा आणि अतिसार नियंत्रण मोहिमेला सहकार्य करून आपले शहर बालमृत्यूमुक्त व सुदृढ बनवण्यास मदत करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# भोकर-म्हैसा मार्गावर दोन भीषण अपघातात अंगणवाडी सेविकेसह तरुणाचा मृत्यू

## भरधाव वाहनांचा वेग ठरतोय जीवघेणा; एकाच दिवसात दोन कुटुंबांवर दुःखाचा डोंगर



**भोकर (प्रतिनिधी) –** भोकर-म्हैसा राज्य मार्गावर मंगळवार, दि. २३ जून रोजी दुपारी २ ते ३ वाजताच्या दरम्यान झालेल्या दोन वेगवेगळ्या आणि भीषण अपघातांत एका अंगणवाडी सेविकेसह एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला. या हृदयद्रावक घटनांमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली असून, वाढत्या अपघातांमुळे या मार्गाच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

खडकी (ता. भोकर) येथील अर्चना गोविंद शिंदे-बिरगाळे (वय ३२) या काही महिन्यांपूर्वीच अंगणवाडी सेविका म्हणून कर्तव्यावर रुजू झाल्या होत्या. मंगळवारी सकाळी त्या आपली स्कुटी (एमएच २६ सीडब्ल्यू १९६१) घेऊन खडकीवरून भोकरकडे ड्युटीवर येत होत्या. नागापूर पाटीजवळ येताच समोरून आलेल्या भरधाव आयचर ट्रकने (एमएच ४१ एटी १८१९) त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, ट्रकने स्कुटीला थेट एक किलोमीटर अंतरावर असलेल्या चिंचाळा फाट्यापर्यंत फरफटत नेले. ज्यामध्ये अर्चना शिंदे यांचा जागीच मृत्यू झाला. अर्चना यांच्या पश्चात एक मुलगा आणि एक मुलगी आहे. आई... आई... असा हंबरडा फोडत आपल्या मातेच्या मृतदेहाला बिलगलेल्या त्या लेकरांचा आक्रोश पाहून उपस्थित सर्वांचे डोळे पाणावले. एका कर्तबगार मातेच्या निधनाने खडकी गावात हळहळ व्यक्त होत आहे.

**बसच्या धडकेत तरुणाचा मृत्यू**

दुसऱ्या घटनेत भोकर-म्हैसा मार्गावरील पोमनाळा येथील व्यंकटेश कॉटनजवळ मन्मथ शंकर कापसे (वय २९, रा. पळसा, ता. हदगाव) यांचा एसटी बसच्या धडकेत मृत्यू झाला. मन्मथ हे मोटारसायकलवरून (एमएच २६ एएल ५४९३) जात असताना समोरून येणाऱ्या एसटी बसशी (एमएच १३ सीयू ६८७३) त्यांची समोरासमोर धडक झाली. मोटारसायकल थेट बसच्या चाकाखाली आल्याने त्यांचा घटनास्थळीच अंत झाला.

अपघाताची माहिती मिळताच भोकर पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक शैलेंद्र औटे यांनी आपले सहकारी पो.हे.कॉ. राजेश्वर करणे, पोहेकॉ टेकाळे व इतर कर्मचाऱ्यांसह तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून अपघातास कारणीभूत ठरलेल्या आयचर ट्रक चालकाला ताब्यात घेतले आहे. तसेच, दोन्ही अपघातांतील मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी भोकर येथील ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला आहे.



**नांदेड–** महेश नवमीनिमित्त दरवर्षीप्रमाणेच याहीवर्षी माहेश्वरी समाज बांधवांच्यावतीने शोभा यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माहेश्वरी समाज बांधव व भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. (छाया : करणसिंह बैस)

# खा. नागेश पाटील यांचा ताफा अडवल्याप्रकरणी ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख बबनराव बारसे यांच्यासह ८ जणांविरुद्ध गुन्हे दाखल

**अर्धापूर (प्रतिनिधी) –**हिंगोलीचे खा. नागेश पाटील आष्टीकर यांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केल्याने ते नांदेड विमानतळावरून हदगावकडे जात असताना सोमवार, दि. २२ जून रोजी रात्री ९ वा. विठ्ठलराव देशमुख मंगल कार्यालयाच्या गेटसमोर त्यांचा ताफा अडवल्याप्रकरणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख बबनराव बारसे यांच्यासह आठ जणांविरुद्ध शासकीय कामात अडथळा यासह विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले.

खा. नागेश पाटील आष्टीकर यांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केल्यानंतर मुंबई येथून नांदेड विमानतळावर आले. ते हदगावकडे जात असताना विठ्ठलराव देशमुख मंगल कार्यालयाजवळ शिवसैनिकांच्या जमावाने गद्दार असे फलक हातात घेऊन घोषणाबाजी केली. यावेळी बंदोबस्तावर असलेले पोलीस निरीक्षक महादेव मांजरमकर, पोलीस उपनिरीक्षक सुरेश भोसले, जमादार माधव पाटील यांनी त्यांना शांत करण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी घोषणाबाजी केली.पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मदतीने त्यांना ताब्यात घेतले. शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख बबनराव बारसे, नांदेड तालुकाप्रमुख सुनील कदम, संघटक बालाजी सुनपे, गजानन गव्हाणे, मनोज यादव, वकील राठोड, विजय बिचेवार, श्याम गिरी यांच्याविरुद्ध जमाबंदी आदेश लागू असताना आदेशाचे उल्लंघन करून शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी जमादार भीमराव राठोड यांच्या फिर्यादीवरून गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# संस्कार भारती नांदेड महानगर समितीतर्फे भावांजली कार्यक्रमाचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** स्व. आशा भोसले, स्व. सुमन कल्याणपूर, स्व. पं. चंद्रकांत लिमये व स्व. पं. प्रसाद सावकार यांना गाण्याच्या म ाध्यमातून भावपूर्ण आदरांजली अर्पण केली जाणार आहे. सदरील कार्यक्रम दि. २५ जून २०२६ गुरुवार, सायंकाळी ६ वाजता गिरीराज मंगल कार्यालय काबरा नगर रोड येथे संपन्न होणार आहे. विशेष उपस्थितीत संस्कार भारतीचे अखिल भारतीय संघटन मंत्री दादा गोखले यांची लाभणार आहे.

पं. संजय जोशी, सौ. अंजली दिक्षीत व कु.चैती दीक्षित हे गायक कलाकार गाणी सादर करणार आहेत. त्यांना साथ-संगत प्रा. डॉ. जगदीश देशमुख (तबला), मिहीर जोशी (हार्मोनियम), पंकज शिरभाते (व्हायोलिन), भगवानराव देशमुख (सहवाद्य) यांची असून निवेदन प्रा. डॉ. वैशाली कुलकर्णी - गोस्वामी ह्या करणार आहेत.

# एस.जी.जी.एस. अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्थेचा विद्यार्थी अनुज अग्रवालची गुगल कंपनीत निवड

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** श्री गुरु गोबिंदसिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था, विष्णुपुरी येथील बी. टेक. इलेक्ट्रॉनिक्स व टेलिकम्युनिकेशन शाखेचा अंतिम वर्षात शिक्षण घेणारा विद्यार्थी अनुज अग्रवाल याची गुगल आयटी सर्व्हीस इंडिया प्रा. लि. या नामांकित कंपनीमध्ये सॉफ्टवेअर इंजिनिअर पदावर नियुक्ती झाली आहे.



कंपनीकडून देण्यात आलेल्या ऑफरनुसार अनुज अग्रवाल याला निव्वळ वेतन रु.३० लाख ५३ हजार ९०८ रुपयांसह वार्षिक रु. ६१ लाख पॅकेजवर नियुक्ती देण्यात आली आहे. या उल्लेखनीय यशामुळे संस्थेचा शैक्षणिक व तांत्रिक दर्जा पुन्हा अधोरेखित झाला असून, विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या वर्षात विविध विभागांशी समन्वय ठेवून प्लेसमेंट विभागानी घेतलेल्या अधिकच्या परिश्रमातून रु.५५ लाखांपेक्षा वरच्या पॅकेजवर विद्यार्थ्याची नियुक्ती होण्याची ही तिसरी वेळ आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये ६८० पात्र विद्यार्थ्यांपैकी ५०० हून अधिक विद्यार्थ्यांना परिसर मुलाखतीद्वारे रोजगारांच्या संधी उपलब्ध झाल्या असून ४०० हून अधिक विद्यार्थ्यांची विविध नामांकित बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये निवड/ नियुक्ती झाली आहे. ९० हून अधिक नामांकित बहुराष्ट्रीय कंपन्यांनी संस्थेत येवून परिसर मुलाखती घेतल्या. जवळपास ७०% हून अधिक विद्यार्थ्यांना परिसर मुलाखतीमधून रोजगारांच्या संधी प्राप्त झाल्या आहेत.



**नांदेड –**शहरातील जायकवाडी वसाहतीमधील काढण्यात आलेला पंचरंगी ध्वज पुनर्स्थापित करावा या प्रमुख मागणीसह इतर मागण्यांच्या पुर्ततेसाठी वंचित बहुजन आघाडीच्यावतीने तहसील कार्यालयावर जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. या मोर्चामध्ये हजारोंच्या संख्येने आंबेडकरी जनतेने सहभाग दर्शविला. **(छाया–विनोद महाबळे)**

# अखेर किनवटमध्ये पावसाला सुरुवात

**किनवट (प्रतिनिधी)** –मोठ्या प्रतीक्षेनंतर सोमवार, दि. २२ जूनच्या रात्री किनवट तालुक्यात दमदार पावसाला सुरुवात झाली. या पावसामुळे शेतकऱ्यांसह सर्वांनाच दिलासा मिळाला. पावसानंतर मंगळवार, दि. २३ रोजी शेतकऱ्यांनी पेरणीला सुरुवात केली आहे.

पावसाळ्याला सुरुवात होऊन पंधरवडा लोटला, परंतु तालुक्यात कुठेच दमदार पाऊस झाला नाही. जून महिन्याच्या अखेरच्या टप्प्यातही उन्हाची तीव्रता कमी होत नव्हती. उन्हाची काहिली अन् उकाड्यामुळे लोक हैराण होते. पावसाअभावी पाणी टंचाईचे सावट निर्माण झाले होते. प्रखर उन्हामुळे सर्वच जलस्त्रोतांनी तळ गाठला आहे.पेरणीपूर्व मशागतीची कामे आटोपून शेतकरी दमदार पावसाच्या प्रतीक्षेत होते.पाऊस लांबणार,या शक्यतेमुळे शेतकरी चिंताग्रस्त होते.पावसासाठी वरुणदेवतेला साकडे घातले जात असतानाच सोमवारी रात्री तालुक्यात दमदार पावसाला सुरुवात झाली.सुमारे दोन तास बरसलेल्या दमदार पावसामुळे चराचराला हायसे वाटले.रात्री पडलेल्या जोरदार पावसानंतर मंगळवारी शेतकऱ्यांनी पेरणीची लगबग केली.मंगळवारी दुपारपर्यंतच्या ढगाळ वातावरणानंतर पावसाची रिमझीम सुरू झाली.अखेर उशिरा का होईना,पाऊस सक्रिय झाला असल्याने शेतकरी

# गुंगीचे इंजेक्शन देऊन गोवंशाची तस्करी करणारी टोळी जेरबंद

## रोख अडीच लाख रुपयांसह १५ लाख ६३ हजारांचा मुद्देमाल जप्त; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** शेतावर किंवा रस्त्याने चरणाऱ्या गोवंशाला गुंगीचे इंजेक्शन देऊन शेतकऱ्यांची नजर चुकवत गोवंश तस्करी करणारी टोळी स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळ्यात अडकली. या टोळीकडून एक नव्हे, दोन नव्हे तर तब्बल १४ गुन्हे उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले आहे. अटक केलेल्या चोरट्यांकडून रोख दोन लाख ६२ हजार रुपये, गुंगीचे औषध, सिरेन इंजेक्शन, एक चार चाकी वाहन असा पंधरा लाख ६३ हजार पाचशे रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

जिल्ह्यामध्ये ऑपरेशन फ्लश आऊट अंतर्गत माली गुन्हे उघडकीस आणून अवैध धंद्यावर प्रतिबंध बसावा आणि गुन्हेगारांच्या हालचाली बंद व्हाव्यात या



हेतूने पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी ही मोहीम सुरू करून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांच्यासह जिल्ह्यातील सर्व ठाणेदारांना कारवाई करण्याच्या सूचना दिल्या.

त्या अनुषंगाने दि. २२ जून २०२६ रोजी गस्त दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक महेश कोरे व त्यांची टिम नांदेड शहरात पेट्रोलींग करीत असताना वाजेगाव नांदेड येथे आले असता त्यांना खबऱ्याकडून माहिती मिळाली की, जनावरांची चोरी करणारे काहीजण गोदावरी नदीच्या किनाऱ्यावर वाहेद कॉलनी, बोंढार बायपास जवळील शेख सलीम याचे घरात किरायाने राहत आहेत. त्यांच्याजवळ एक सिल्वर रंगाची टोयोटा ईनोव्हा वाहन आहे, अशी खात्रीशीर माहिती मिळाल्यावरून सदरची माहिती पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांना देऊन त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि महेश कोरे व त्यांच्या टीमने दि. २२ जून २०२६ रोजी दुपारी सव्वाचार वाजताच्या सुमारास गोदावरी नदीच्या किनाऱ्यावर वाहेद कॉलनी शेख सलीम याचे घरून आरोपी अजीम रौफ गाझी (वय ३१ वर्ष रा. बैलबाजार, आंबेडकर रोड, कल्याण जि ठाणे), सय्यद समीर उर्फ बाबू सय्यद समी अहेमद (वय २३ वर्ष रा.लेबर कॉलनी नांदेड) यांना ताब्यात घेवून विचारपूस केली असता त्यांनी आरोपी क्र. ३ ते १७ यांच्यासोबत मिळून नांदेड जिल्ह्यात पोलीस स्टेशन अर्धापूर, लिंबगाव, मनाठा, उमरी, कंधार, उस्मानगर, मरखेल, किनवट, मुक्रमाबाद, मांडवी, बिलोली, भाग्यनगर हद्दीत गोवंशीय जनावारास गुंगीचे इंजेक्शन देऊन चोरी करून विक्री केल्याची कबुली दिली.

# मराठवाडा जनता विकास परिषदेचे भोकर येथे २८ रोजी अधिवेशन

**भोकर (प्रतिनिधी)–** मराठवाडा जनता विकास परिषद जिल्हा शाखा नांदेडचे अधिवेशन दि. २८ जून रोजी भोकर तालुक्यातील आनंदधाम, सीताखंडी येथे आयोजित करण्यात आले आहे. या अधिवेशनात जिल्ह्यातील प्रलंबित विविध कामांच्या अनुषंगाने चर्चा होणार आहे.

मराठवाडा जनता विकास परिषद ही स्वातंत्र्योत्तर मराठवाडा विभागाच्या विकासासाठी लोकशाही मार्गाने लढा देणारी संघटना असून, मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासात या संघटनेचे योगदान महत्त्वाचे आहे. संघटनेच्या केंद्रीय कार्यकारिणीने प्रत्येक जिल्ह्याने आपापल्या जिल्ह्यातील विकास विषयक प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी अधिवेशनाच्या माध्यमातून चर्चा घडवून आणाव्यात आणि शासनाकडे त्यासाठीचा पाठपुरावा करावा, असे आदेश दिले आहेत. त्यानुसार नांदेड जिल्हा शाखेने २८ जून रोजी मराठवाडा जनता विकास परिषद जिल्हा शाखा नांदेडचे अधिवेशन आनंदधाम , सीताखंडी ता. भोकर येथे आयोजित करण्यात आले आहे.

या अधिवेशनासाठी मराठवाडा जनता विकास परिषद औरंगाबादचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे, सचिव प्रा. अर्जुन जाधव, माजी खासदार डॉ. व्यंकटेश काब्दे, नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सी.ए. डॉ. प्रवीण पाटील, संपादक शंतनू डोईफोडे आदी मान्यवर उपस्थित राहणार असून, अधिवेशनात जिल्ह्यातील विविध विकासविषयक प्रश्नांवर चर्चा होईल. नांदेड जिल्ह्यातील सर्व तालुका शाखांच्या पदाधिकारी व सदस्यांनी अधिवेशनास उपस्थित राहून सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाध्यक्ष प्रा. डॉ. बालाजी कोम्पलवार, भाऊराव मोरे, गोविंदराव पाटील सिंधीकर, संभाजी शिंदे, प्रा. डॉ. अशोक सिद्धेवाड, प्रभाकर लखे, इंजि. विश्वंभर पवार, श्रीनिवास शिंदे व विठ्ठल फुलारी यांनी केले आहे.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.



फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com